९९६३
(९०)
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. १८९०

ीत सौभद्र —

# नाट्यसमीक्षा

डॉ. वि. पां. दांडेकर
एम. ए., पीएच्. डी.

REFBK-0013121

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी : पुणें २.

७९५२१ संदर्भ
२६।३।६० निबंध

—संगीत सौभद्र—

# नाट्यसमीक्षा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७९५२१ वि: निबंध
क्रमांक ९२९० नों दि: २६।३।६०

लेखक
डॉ. वि. पां. दांडेकर
एम्. ए., पीएच्. डी.

REFBK-0013121
REFBK-0013121

मूल्य १ रुपया

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७९५२१
दा. क.
(स्थळ प्रत)

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी : पुणें २.

प्र का श क

**अ. ज. प्रभू**
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३२० शुक्रवार पेठ, पुणें २.

♣

© विदर्भ मराठवाडा बुक कंपनी

♣

प्रथमावृत्ति १९६३

♣

मु द्र क

**ज. ग. जोशी**
जनार्दन प्रेस
३९४ सदाशिव, पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ६९५३१ दि: १।९।७५
वर्ग ...९८७१...
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ७३९२९

# सौभद्र

## एक अद्वितीय नाटक

मराठी नाट्यसृष्टींतील एका अद्वितीय नाटकाची समीक्षणात्मक सेवा करण्याचा सुयोग आज येत असलेला पाहून एक प्रकारें मला धन्यता वाटत आहे. संगीत सौभद्र नाटकाचा पहिला प्रयोग ( पहिल्या तीन अंकांचा हा प्रयोग होता. संपूर्ण नाटकाचा प्रयोग मार्च अठराशे त्र्यैशी–१८८३ मध्यें झाला. ) पुणें येथें पूर्णानंद नाटकगृहांत ता. १८ नोव्हेंबर १८८२ रोजीं झाला, आज इ. स. १९६२ साल आहे. म्हणजे ऐशीं वर्षें झालीं या नाटकाला ! सतत ऐशीं वर्षें ज्याचे प्रयोग होतात, असें हें एकच नाटक तूर्ततरी मराठी साहित्यांत आहे. मराठी रंगभूमीवर प्रयोगदृष्ट्या पहिल्या प्रतीचीं ठरलेलीं शारदा, संशयकल्लोळ, मृच्छकटिक, विद्याहरण, मानापमान, भाऊबंदकी, एकच प्याला, बेबंदशाही आदि नाटकें आहेत. पण त्यांचे प्रयोग प्रत्येक वर्षीं असे क्वचितच होतात. सतत ऐशीं वर्षें प्रयोग होण्याचें भाग्य संगीत सौभद्राचेंच होय. “ देवांना वार्धक्य येत नाहीं अशी समजूत आहे. अशा देवकोटीला पोचलेल्या मराठी नाटकांची यादी करूं लागल्यास तिच्यांत श्रीकाराच्या खालीं सौभद्राचेंच नांव घालायला लागेल,” असें जें सुप्रसिद्ध टीकाकार श्री. वि. स. खांडेकर म्हणतात तें योग्यच होय. ( मराठीचा नाट्यसंसार पृ. ४१ )

बळवंत पांडुरंग ऊर्फ अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी ‘ अल्लाउद्दिनाची चितुरगडावर स्वारी ’ (१८६७ ते १८७०), शाङ्करदिग्विजय (१८७३), शाकुन्तल ( १८८०–८१ ), सौभद्र ( १८८२–८३ ), आणि रामराज्यवियोग (१८८४) अशीं लहान मोठीं, पूर्ण अपूर्ण पांच नाटकें लिहिलीं. या सर्व नाटकांत सौभद्र नाटकानें त्यांना अलौकिक कीर्ति प्राप्त करून दिली. आणि याचें कारण उघड आहे. शाकुंतल या नाटकाचा बोलबाला

जरी पुष्कळ झाला, आणि त्यांतील अण्णांच्या पदांनी श्रोते कितीहि खूष झाले, तरीदेखील त्या नाटकाच्या श्रेयाचा वाटा किर्लोस्करांपेक्षां कालिदासाकडे अधिक जातो. अल्लाउद्दिनाची स्वारी व शाङ्करदिग्विजय हीं नाटकें फारशी रंगभूमीवर आलींच नाहींत. रामराज्यवियोग हें अपूर्ण आहे. अशा परिस्थितींत, अण्णांच्या कर्तृत्वाचा उत्तम परिपोष झाल्याचें व्यक्त करण्याची कामगिरी सौभद्राकडे येऊन, त्या नाटकाकडून ती फार चांगल्या प्रकारें बजावली गेली आहे. अण्णासाहेबांच्या काळीं आणि तदनंतरहि आज बरींच वर्षें त्यांचें नांव महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेर खूपच गाजलें आहे. इतकें कीं नाटक पहावें तर तें किर्लोस्करांचें 'सौभद्र' पहावें, अशा प्रकारची बऱ्याच लोकांची समजूत झाली आहे.

संगीत सौभद्रांत असें काय आहे कीं, ज्यानें तें रचनाकालीं व आजहि लोकप्रिय ठरावें. माझ्या दृष्टीनें हीं कारणें पुढीलप्रमाणें आहेत. (१) संगीत सौभद्रासारखी रम्य कथा अण्णासाहेबांनीं महाभारतांतून घेतली असली तरी तिच्यांत त्यांनी आकर्षक असा पुष्कळच बदल केला आहे. (२) संगीत सौभद्राचा नायक कोण असा गोड संभ्रम उत्पन्न होण्याजोगें कृष्णाचें व अर्जुनाचें स्वभावलेखन झालें आहे. (३) संगीत सौभद्रांतील विनोद विविध प्रकारचा असून तो रमणीय आहे. (४) एक पौराणिक नाटक या दृष्टीनें आदर्श ठरणारें हें नाटक आहे. (५) संगीत सौभद्रांतील संगीत-योजना अत्यंत सरस आहे. (६) यांत आलेले नाट्यप्रसंग कलापूर्ण आहेत. (७) नाट्यप्रसंगांप्रमाणेंच भावनांचा परिपोष करणारे भावोत्कट, रसोत्कट प्रसंग यांत आहेत, (८) संगीत सौभद्राचें संविधानकरचनाचातुर्य वाखाणण्याजोगें आहे. (९) सौभद्रांतील स्वभावलेखन सामान्यपणें महाभारताला धरून असलें तरी तें उल्लेखनीय आहे. (१०) सौभद्रांतील संवाद चटकदार आहेत. (११) सौभद्राची भाषा पात्रानुरूप, प्रौढ, सुबोध व घरगुती आहे. (१२) किर्लोस्करांनीं आपल्या मदतीला असलेल्या नटांकडे व नाटकें पाहायला येणाऱ्या प्रेक्षकांकडे पाहून कांही कांही गोष्टी सौभद्रांत आणिल्या आहेत. आतां याच कारणांचें कांहींसें विस्तारपूर्वक विवेचन करूं या.

## महाभारतांत आलेलें सुभद्राहरणाचें आख्यान व त्यांत किर्लोस्करांनीं केलेला बदल

प्रथम महाभारतांत ( श्रीमन्महाभारतार्थ, द्वितीय खंड, ले. आचार्य-भक्त विष्णू वामन बापटशास्त्री, भारत गौरव ग्रंथमाला, पुष्प ८२ वें ) आलेलें आख्यान देतो तें येणेंप्रमाणें:—

तिलोत्तमेसाठीं सुंदोपसुंदांनीं स्वतःचा करून घेतलेला नाश पाहून नारदमुनी पांडवांना म्हणाले, " जर तुम्हांला माझें प्रिय करण्याची इच्छा असेल तर, ज्यायोगें द्रौपदीसाठीं तुम्हामध्यें भेद उत्पन्न होणार नाहीं, असें वर्तन तुम्ही ठेवा." नारदाचें हें वचन ऐकून परस्परांवर प्रेम करणाऱ्या बलाढ्य पांडवांनीं, " आमच्यापैकीं एक भ्राता द्रौपदीसह असतांना तेथें जो कोणी दुसरा भ्राता जाईल, त्यानें बारा वर्षें ब्रह्मचर्यानें वनांत रहावें," असा देवर्षींच्या समक्ष नियम केला असतां तो महामुनी मोठ्या संतोषानें इष्ट देशीं निघून गेला. याप्रमाणें पांडवांनीं नारदमुनींच्या प्रेरणेनें पूर्वींच नियम करून ठेवल्यामुळें त्यांच्यामध्यें परस्पर वैर उत्पन्न झालें नाहीं.

( महाभारत, आदिपर्व, अ. २१२ )

वैशम्पायन म्हणाले, " हे पांडवेया, याप्रमाणें दीर्घकाल लोटल्यावर एकदां कांहीं चोरांनीं एका ब्राह्मणाच्या गाई चोरल्या. " तें पाहून ब्राह्मण क्रुद्ध होऊन पांडवप्रस्थास आला व क्रोध करूं लागला; " हे पांडवहो, निर्दय चोर माझ्या घरातून माझें गोधन बलात्कारानें हरण करून नेत आहेत..." त्या ब्राह्मणाचें वचन ऐकून कुंतिपुत्र धनंजय म्हणाला, " ब्राह्मणा भिऊं नकोस. " पांडवांचीं आयुधें जेथें ठेवलीं होतीं तेथें धर्मराज–युधिष्ठिर कृष्णेसह होता. त्यामुळें त्या वीर पांडवाला आपलीं आयुधें घेण्यासाठीं तेथें जातां येईना; व आयुधांवांचून त्याला चोरांचा पाठलागहि करतां येईना. अशा स्थितींत त्यानें मनांत असा विचार केला, " हा ब्राह्मण राजद्वारीं येऊन असा आक्रोश करीत असतांना जर मी याचें रक्षण केलें नाहीं, तर आमच्या रक्षणावरील सर्वांचा विश्वास उडेल. राजाचा अनादर करून स्त्रीसह असलेल्या अजात शत्रूपाशीं जर मी गेलो तर त्याचा नियम

मोडला असें होईल, व आमच्या नियमांप्रमाणें बारा वर्षें वनवास करावा लागेल. वनवासादि बाकीचें सर्व राजाच्या अपमानापुढें तुच्छ आहे. अधर्म त्याहिपेक्षां भयंकर आहे. यास्तव वनामध्यें मला मरण आलें तरी चालेल पण या प्रसंगीं ब्राह्मणाच्या धनाचें रक्षण करणें सर्वथः उचित होय. " असा विचार करून कुंतिपुत्र धनंजय आयुधागारांत गेला व राजाच्या आज्ञेनें आपलें धनुष्य घेऊन संतुष्ट चित्तानें बाहेर आला......थोड्याच अवधींत बाणांनी त्या चोरांचा नाश करून ब्राह्मणाचें गोधन सोडविलें आणि तें ब्राह्मणाला परत देऊन संतुष्ट केलें.

त्यानंतर तो सत्यप्रतिज्ञ अर्जुन धर्मराजास म्हणाला, " हे प्रभो मला व्रताचरणाची आज्ञा द्या. द्रौपदीसह एकान्तात असलेल्या तुझ्या जवळ येऊन मी नियमांचें उल्लंघन केलें आहे. यास्तव आतां मी बारा वर्षें वनवास करीन. " यावर युधिष्ठिर म्हणाला, " माझें तूं कांहीहि अप्रिय केलेंस असें माझ्या मनांतहि येत नाहीं. यास्तव तूं हा संकल्प सोड व माझें वचन मान्य कर. " त्यावर अर्जुन म्हणाला, " मी आपल्या आयुधाला स्पर्श करून सत्य सांगतो कीं, मी आपल्या सत्य प्रतिज्ञेपासून केव्हांहि ढळणार नाहीं. " असा आपला निग्रह व्यक्त करून अर्जुन वनवासास सज्ज झाला व बारा वर्षें वनांत रहाण्याच्या संकल्पानें निघून गेला. ( महाभारत, आदिपर्व, अ. २१३ )

वैशम्पायन म्हणाले, " हे परिक्षिता, अर्जुन पवित्र तीर्थें पहात पहात प्रभास क्षेत्रीं आला. श्रीकृष्णानें हें ऐकल्यावर आपल्या मित्राला भेटावयास तो प्रभास क्षेत्रीं गेला. या प्रसंगीं बोलता बोलता वासुदेव अर्जुनास म्हणाला, " हे पार्था तूं हें तीर्थाटन व वनवास कशासाठीं करीत आहेस ? " हा प्रश्न ऐकून अर्जुनानें घडलेला सर्व वृतान्त त्यांस निवेदन केला. तो ऐकून कृष्णानें संतोष व्यक्त केला. त्यानंतर ते दोघे प्रभास क्षेत्रीं विहार करून रैवतक पर्वतावर रहावयास गेले. त्या वेळीं वृष्णी व आंधक यांचा रैवतक पर्वतोत्सव सुरूं झाला. त्या वेळीं त्या उत्सवांत आपल्या सख्यांसह फिरणारी सुभद्रा पार्थाचे दृष्टीस पडली. तिला पहातांच तो कामवश झाला व एकाग्रतेनें तिजकडे पाहू लागला. त्याच्या मनाची ही चलबिचल पाहून

नरश्रेष्ठ कृष्ण हंसत म्हणाला, " पार्था काय हे ! वनांत राहून तीर्थयात्रा करणाराचें मन असें कामासक्त कां होत असते ? ही माझी भगिनी सुभद्रा आहे...तुझें मन जर खरोखरच तिच्यावर बसलें असेल तर मी स्वतः पित्याला सांगून ती तुला देववीन." त्यावर अर्जुन म्हणाला, " हे कृष्णा, ही रूपसंपन्न सुंदरी कोणाला मोहित करणार नाहीं ? हे जनार्दना, ही मला कोणत्या उपायानें प्राप्त होईल तें सांगा." हें ऐकून वासुदेव म्हणाला, " हे पुरुषश्रेष्ठा, क्षत्रियांना स्वयंवर विवाह विहित आहेत...पण स्वयंवरांतील निवड संशयित असते. बलात्कारानें वधूचें हरण करणें क्षत्रियांना विहित आहे... यास्तव हे वीरा, या माझ्या भगिनीचें तूं बलात्कारानें हरण कर."

राजा परिक्षिता, असें बोलून श्रीकृष्ण व अर्जुन यांनी पुढील सर्व योजना निश्चित् केली. आणि धर्मराजाची संमति घेण्यासाठीं शीघ्रगामी दूत इन्द्रप्रस्थास रवाना केले. तेव्हां युधिष्ठिरानें तें सर्व ऐकून पार्थाला सुभद्राहरणाची अनुज्ञा दिली. (महाभारत, आदिपर्व अ. १२९)

वैशम्पायन म्हणाले, " हे भरतश्रेष्ठा, त्यानंतर सुभद्रा त्या रैवतक पर्वताचें व देवतांचें पूजन करून सर्व ब्राह्मणांनी स्वस्तिवाचन केलें असतां, पर्वताला प्रदक्षिणा घालून द्वारकेला परत यावयास निघाली. तेव्हां कौन्तेयानें बलात्कारानें तिला ओढून आपल्या रथांत घेतली व तो स्वनगरीला त्वरेनें जावयास निघाला.

याप्रमाणें सुभद्रा हरण केली जात आहे असें पाहून सर्व सैनिक आक्रोश करीत द्वारकेकडे धांवले. त्यांनी सुधर्मा नामक सभेंत जाऊन तेथील सभापतीला पार्थाचा पराक्रम निवेदन केला. त्यावर सभापतीनें भोज, वृष्णी व आंधक यांची सभा घेतली आणि जिष्णूचें साहस त्यांस निवेदन केलें. तें ऐकताच ते सर्व संतापानें आपआपल्या स्थानांवरून उठले......ही त्यांची गडबड पाहून बलराम त्यांना म्हणाला, " हे मूढांनो, वासुदेव स्वस्थ बसला असतांना तुम्ही हें काय करितां ? या बुद्धिमान कृष्णाला त्याचा अभिप्राय सांगू द्या आणि त्याला जे योग्य दिसेल तेंच दक्षतेनें करा...(महाभारत, आदिपर्व अ. २२०)

वैशम्पायन म्हणाले, “ हे राजेन्द्रा, याप्रमाणें बलरामाचें भाषण ऐकल्या-वर वासुदेव धर्म आणि अर्थ यांनी युक्त असें वचन बोलला; “ हे यादवांनो, धनंजयानें आपल्या कुलाचा मुळींच अपमान केला नसून उलट त्यानें अधिक सन्मानच केला आहे. पार्थ तुम्हा मंडळींना केव्हांहि धनलुब्ध मानीत नाहीं. त्यामुळें त्याला आसुर विवाह शक्य नव्हता. स्वयंवरांत वधू आपल्यालाच वरील असा नेम नसल्यानें त्याला स्वयंवरहि ग्राह्य वाटलें नाहीं. पशूप्रमाणें कन्येचा प्रतिग्रह करणें त्या वीराला कसें रुचावें ? त्यामुळेंच त्या पांडुपुत्रानें कन्येचें बलात्कारानें हरण केलें आहे.....तुम्ही विरोधबुद्धीनें त्याचा पाठलाग केलात व तो तुम्हाला स्वसामर्थ्यानें जिंकून आपल्या खांडव-प्रस्थाला परत गेला तर तुमचें यश तत्काळ नाहीसें होईल. त्यापेक्षा योग्य संबंधाचें महत्त्व ओळखून तुम्ही त्याला परत बोलवा. त्यांत पराजयाची मुळींच भीति नाहीं. ” हे राजा, वासुदेवाचें हें वचन ऐकून यादवांनीं तसेंच वर्तन केलें. त्यांच्या विनंतीस मान देऊन अर्जुन परत आला. त्या प्रभूनें सुभद्रेशीं यथाविधि विवाह केला व वनवासाच्या बारा वर्षांतील जो एक वर्षाहून कांहीं अधिक काल अवशिष्ट राहिला होता त्यांतील बहुतेक काल तेथेंच घालविला. द्वारकेंत असेपर्यंत त्यानें यथेष्ट विहार केला व वृष्णी-पुत्रांनीहि त्याचा मोठा सत्कार केला. त्यानंतर जो थोडासा काल राहिला होता तो सुभद्रेसह पुष्कर तीर्थावर घालवून बारा वर्षें पूर्ण झालीं असता अर्जुन खांडवप्रस्थास आला. ( महाभारत, आदिपर्व, अ. २२१ )

वर दिलेल्या महाभारतांतील सुभद्राहरणाच्या आख्यानाला समोर ठेवून, अण्णासाहेब किर्लोस्करांनी आपल्या सौभद्र नाटकांत कोणकोणते व कोठें कोठें बदल केलेत हे पहाणें आवश्यक व अगत्याचें ठरेल. हे बदल सामान्यपणें नाटकांतील अंकाच्या क्रमानें पहाण्याचा येथें प्रयत्न करण्यांत आला आहे.

**अंक पहिला :** बलरामानें सुभद्रा दुर्योधनाला देण्याचा निश्चय केल्याची बातमी, सूत्रधाराकडून अर्जुनाच्या कानावर पडून तो विषण्ण होतो, परस्पर प्रेमाच्या जुन्या आठवणी त्याला होऊन ( होतों द्वारकाभुवनीं। पाहिली प्रिया नयनीं । पूर्ण होती मला वशिनी । कसा शठ ती वरिल कामिनी । ) तो

दुःखी होत्साता धर्मदर्शनाला जायला निघतो. अर्जुनाचे हे स्वगत उद्‌गार व त्यांत व्यक्त झालेल्या भावना स्वतंत्र आहेत. सुभद्रा दुर्योधनाला देण्यासंबंधीची माहिती महाभारतांत नसली तरी ती भागवतांत आहे. ( श्रीमद्‌भागवत, स्कंद १०, उत्तरार्ध, अध्याय ८६ श्लोक १ ते १२ ) नारदाचा प्रवेश बव्हंशीं स्वतंत्र असून सरस आहे. त्यांतील पांडवांनी आपापसांत द्रौपदीच्या बाबतींत कसें वागावें हा भाग, तसेंच ब्राह्मणाच्या गाई सोडवून आणण्याच्या प्रसंगीं, शस्त्रागारांत असलेल्या धर्मद्रौपदीला पाहिल्यामुळें अर्जुनाला वनवास कसा पत्करावा लागला ही हकीगत महाभारतांत आहे. ( यांतहि महाभारतकार व मोरोपंत बारा वर्षांचा वनवास सांगत असले तरी तो नाटककारानें एक वर्षाचा केला आहे. ) बाकी सर्व प्रवेश स्वतंत्र आहे. यांत नारदाला अर्जुन त्याच्या सुभद्रेविषयीच्या लहानपणापासूनच्या भावना सांगतो. ( मी कुमार तीहि कुमारी । असतांना जागीं एका । वाढलो खेळलो प्रेमें । प्रिय झालो एकामेकां......तैशांत रामकृष्णांनी वडिलांचें मत घेवोनी । मज दिधली ऐसें म्हणुनी । शेवट मग केला हा कां । ) व आपली निर्भत्सना करतो. आपल्या भावांना शेवटचा निरोप तो नारदाकरवी देतो आणि त्याच्याजवळ संन्यास घेण्याची इच्छा व्यक्त करतो. नारद यावर त्रिदंडी संन्यासाची कल्पना सुचवितो. वर दिलेल्या महाभारतांत संन्यासाची कल्पना नाहीं. मात्र ती भागवतांत ( दशमस्कंद, उत्तरार्ध, अध्याय ८६ श्लोक १ ते १२ ) तसेंच अनंत कविविरचित चंपूभारतांत आहे. ( तृतीय स्तबक, निर्णयसागर प्रत, श्लोक ५७ ते ७८ ) यतीची कल्पना महाभारताचा मद्रास प्रतींत आहे. परन्तु ही अधिकृत मानली जात नाहीं. ( भांडारकर ओरिएण्टल इन्स्टिटयूटनें प्रसिद्ध केलेल्या महाभारताच्या अधिकृत आवृत्तींत संन्यासाची कल्पना नाहीं. )

घटोत्कचानें—कृष्णाच्या सांगण्यावरून—केलेलें सुभद्राहरण व परत सुभद्रेला तिच्या अंतर्गृहांत नेऊन ठेवणें हा प्रसंग सर्वस्वी स्वतंत्र आहे. या प्रवेशांत आलेल्या निरनिराळ्या घटना केवळ बहारीच्या, रसपरिपोषक व नाट्यपूर्ण आहेत. मूळ महाभारतांत किंवा भागवतांत हें नाहीं. विफल प्रेमभावनेच्या आहारीं गेलेल्या अर्जुनाच्या नजरेस सुभद्रेला पाहून व विरहाच्या

यातना सोसणाऱ्या तिच्या अर्जुनाविषयींच्या प्रेमाचा आविष्कार करून दोघांच्या प्रेमाचा अंकूर टवटवीत केला. या प्रवेशानें अर्जुनाचे मनांत सुभद्रेविषयीच्या आशा पुन्हा जागृत केल्या. मुहूर्त चुकविण्याकरिता सुभद्रेनें घरांतुन पलायन केलें असें लोक बोलतील याकरितां त्यानें सुभद्रेला आलेली मूर्च्छेची घटना स्वतंत्र आहे. तसेंच अर्जुन पाणी आणायला गेला असतांना घटोत्कचाचें तिला परत नेणें, हा प्रसंगहि स्वतंत्र आहे. अर्जुन पाणी आणायला जातांना सुभद्रेनें त्याला दिलेला शेला तो तिच्या देहावर टाकतो व त्यानें सुभद्रेला दिलेली रत्नमाला घटोत्कच तिच्या गळ्यांतून काढून पत्राच्या थैलींत टाकतो. हे पत्र कृष्णानें सुभद्रेच्या अक्षरासारखें अक्षर काढून अर्जुनाला उद्देशून लिहिलेलें असतें. या रहस्याचा उलगडा पुढें पांचव्या अंकांत होतो. या रहस्यमय, रमणीय व नाट्यपूर्ण घटना हा किर्लोस्करांच्या प्रतिभेचा विलास होय. सुभद्रेच्या पत्रांत लिहिल्याप्रमाणें अर्जुन तिला नेईपर्यंत संन्यास घेण्याचें, आणि, " या पत्राचें पारायण व या मालेनें तिच्या मंगल नामाचा जप " ( अंक १ ) करण्याचें ठरवतो.

**अंक २ व ३ :** यांतील सर्वच घटना अण्णासाहेबांनी स्वतःच्या कल्पनेनें नटविल्या आहेत. यांत श्रीकृष्ण आपण रचित असलेली मसलत कशी सिद्धीस जात चालली आहे तें सांगतो. यांतील सर्व प्रसंग सरस व नाट्यपूर्ण आहेत.

**अंक ४ :** यांतीलहि बहुतेक घटना किर्लोस्करकल्पित आहेत. सुभद्रेचें लग्न दुर्योधनाबरोबर होणार व तन्निमित्त घरचें केळवण संपल्यावर वधूकडची मंडळी हस्तिनापुरीं जाणार अशी थाप रुक्मिणी अर्जुनाच्या कानावर पडेल अशा रीतीनें सांगून आणि त्याला अस्वस्थ व कोपयुक्त करून बहारीचा प्रसंगनिष्ठ विनोद तयार करितें.

**अंक ५ :** हाहि अंक स्वतंत्रपणें रचण्यांत आला असून तो नाटकांतील रहस्याचा उलगडा करणारा व नाट्यपूर्ण आहे. बलरामाला प्रथम कोप येणें व गर्गमुनींच्या समजावणीनें त्यानें समंजसपणा दाखवून सुभद्रेचा हात अर्जुनाच्या हातांत देणें या सरस घटना स्वतंत्र आहेत. नाटकांत आलेले राक्षसांचे तीन प्रवेश हे मुळांत नसून स्वतंत्रपणें त्यांची योजना अण्णासाहेबांनीं केली आहे.

## सौभद्र नाटकाचा नायक कोण–अर्जुन कीं श्रीकृष्ण ?

नायक शब्द ‘नी’ या धातूपासून तयार झाला असून, पुढें नेणारा, नाटकाला पुढें नेणारा, नाटकाच्या कथानकाला गति देणारा, तो नायक. या व्याख्येप्रमाणें पाहिलें असतांना, सौभद्र नाटकाचा नायक अर्जुन न ठरता श्रीकृष्ण ठरतो. सौभद्र नाटकांतील बहुतेक घटना घडवून आणण्याचें श्रेय श्रीकृष्णाला आहे. तोच या नाटकाचा सूत्रधार आहे. तो जशी सूत्रें हालवितो, त्याप्रमाणें नाटकांतील पात्रें व प्रसंग घडत जातात. याची जाणीव त्यालाहि आहे. “‘सौभद्रा’”च्या मसलतीचा पाया आपणाला कुठपासून रचावा लागला, तें सांगत असतांना तो म्हणतो, “ तस्करा हातीं ! द्विज गोधन हरिलें तया पार्थासि शरण आणिलें। आयुधागारीं धर्मा निजवीलें। द्रौपदीसह त्या दावियलें। मुनिच्या दंडा। पात्र त्यास केलें। तीर्थाटना पाठवीलें। नारदातें मी। त्यांसी भेटवीलें। इकडचे वृत्त जाणवीलें।” (अंक २) ह्या सर्व घटना घडवून आणीत असतांना आपणाला किती धोरणें सांभाळावीं लागलीं, तीं तो (श्रीकृष्ण) पुढील-प्रमाणें सांगतों; “ गर्गगुरुतें घेतलें वश करोनी। अखेरीची ठरविली तिथी त्यांनीं। बरें झालें कीं दिवस पुढें नाहीं। चार मासांची मिळे अवधि पाही।” (अंक २) घटोत्कचानें सुभद्रेला मोहिनी मंत्राच्या सहाय्यानें अरण्यांत नेऊन तिला अर्जुनाच्या दृष्टीस पाडली, व पुन्हा त्याच्या नकळत तिला नाहींशी केली. यामुळें अर्जुनाला उदासीनता उत्पन्न होऊन तो संन्यास घेण्यास तयार झाला. नाहींपेक्षां त्यानें हे कृत्य करण्याचें पत्करलें नसतें. सुभद्रेच्या अक्षरासारखें अक्षर काढून “ आपल्याला नेता येत नसेल तर संन्यास घ्यावा ” अशी सूचना करणारें पत्र त्यानें लिहून अर्जुनाला मिळेल असें केलें. अर्जुनानें त्याप्रमाणें संन्यास घेऊन रैवतक पर्वतावर आपला आश्रम थाटला. तेथें लोकांची गर्दी होईल; त्याचा नांवलौकिक होईल अशी व्यवस्था गर्गमुनींच्या सहाय्यानें श्रीकृष्णानें केली. याबाबतींत तो सांगतो, “ अर्जुन तर संन्यासी होउनि रैवतकीं बसला। झालि सुभद्रा नष्ट असा ग्रह त्याच्या मनीं ठसला। ...ब्रह्मनिष्ठ वेदांती होउनि तुच्छ मानितो विषयाला...सुभद्रेची मूर्ति हृदयीं धरुनि करितसे ध्यानाला...भोळे असुचे

राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ

दादा तेथें जाति दर्शनाला. " आपला एकंदरींत बेत निर्विघ्नपणें सिद्ध होत चालला आहे असें वाटून श्रीकृष्ण म्हणतो, " संपुनि बहु गेलों। आतां स्वल्प काम उरलें. " तिसऱ्या अंकांतील बलराम-कृष्ण यांच्या संवादांतून बलरामाला वरकरणी विरोध करून आपल्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी श्रीकृष्ण कशा घडवून आणतो तें दाखविलें आहे. बलराम, यति-विषयीं जितका अनुकूल तितका श्रीकृष्ण प्रतिकूल. बलरामानें यतीची जेवतांना झालेली विदेहावस्था वर्णन करताच कृष्ण म्हणतो, " पंक्तीमध्यें नसतो जरि मी भोळे तुम्हा पाहुनि नामी । भलते भलते करिता स्वामी । निश्चयपूर्वक मज वाटे। " यावर बलराम म्हणतो, " आग लागोरे तुझ्या या वाणीला. ज्याला पात्रापात्र विचार नाहीं त्याला मनुष्य म्हणण्यापेक्षां पशू म्हणणें फार चांगलें. " कृष्णाला या बोलण्यानें राग न येतां, बलराम आपल्या जाळ्यांत अडकत चालला हें पाहून आनंद वाटतो. यतीची योजना सुभद्रेच्या महालांत करण्याचा बलरामाचा विचार पक्का होतांच कृष्ण म्हणतो, " दादा या गोष्टीला मात्र मी अगदीं कबूल नाहीं, काय सुभद्रेच्या मंदिरांत त्या यतीची स्थापना करणार ? मग काय विचारता चोराच्या हातीं जामदार-खान्याची किल्ली दिल्याप्रमाणेंच होईल. " हलवून खुंटा बळकट करावा त्या-प्रमाणें वरकरणी विरोध दाखवून कृष्ण आपल्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी कशा घडवून आणतो त्याचा हा एक चांगला नमुना आहे. आपला बेत मनाप्रमाणें घडत चालला याचें समाधान कृष्णाला वाटून, " रचिला ज्याचा पाया त्याची बरी उभारणि झाली। विघ्नावांचुन जुळलें सर्वहि मोठी चिंता सरली। नाही भय उरलें, बहुधां सर्व तडिस गेलें. " अशा रीतीनें आपल्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी घडवून आणणाऱ्या श्रीकृष्णाकडे पाहिलें असता, सौभद्र नाटकाचा नायक तोच ठरावा इतकी त्याची योग्यता आहे. अर्जुन हा त्याच्या हातांतील बाहुल्याप्रमाणें आहे. त्याच्या हातून महत्त्वाची कृति अशी फारशी काहीं घडतच नाहीं. कृष्णाच्या तडफेपुढें अर्जुन नेभळट, फिकट असा वाटतो. पहिल्या अंकांत सुभद्रेचें दर्शन होऊन ती नाहीशी होतांच, त्याला शोक होतो. तो रडकुंडीला येतो आणि वीरपुरुषाला अनुचित असे उद्गार त्याच्या तोंडून निघतात. त्याचा हाडवैरी असा

दुर्योधन असूनहि त्याच्याशी सुभद्रेचा विवाह झाला असता तरी बरें झालें असतें, आपल्याला तिचें दर्शन घडलें असतें असें तो म्हणतो! ( जरि वरिला असता दुर्योधन। पाहिली तरि असती नेत्रांनी। काय करु तुज शोधू कोठें। धैर्य पहा सर्वहि तें खचलें। ) अंक १. याच मनःस्थितींत तो पुढील उद्‌गार काढतो, "अरे, आणखी कितीहि जरी या अरण्यांत बसून रडलो तरी माझें समाधान कोण करणार आहे ?" पुढें पत्राची थैली सांपडून त्यांतील पत्र तो वाचतो आणि म्हणतो, "आतां संन्यासच घेतला पाहिजे, आणि तो घेतल्यावर या पत्राचें पारायण, व या मालेनें तुझ्या मंगल नामाचा जप यावांचून दुसरें कांहीहि करणार नाहीं." नायकाच्या ठिकाणीं जो कणखरपणा पाहिजे, जी धीरोदात्तता पाहिजे ती अर्जुनाच्या ठिकाणीं नाही. या सर्व अडचणींमुळें, "जातो मूढचि होवोनी" असले उद्‌गार तो काढतो! रुक्मिणीनें त्याचें ढोंग उघडकीस आणून त्याला, "आतां तूं पुढें कसें काय करणार ?" असें विचारतांच अर्जुन म्हणतो, "वहिनी तें मला कांहीं सुचत नाहीं...इथून सुभद्रेसहवर्तमान माझी सुटका कशी होईल हे कळत नाहीं." हा म्हणे नाटकाचा नायक! नाटकाच्या शेवटीं शेवटीं अर्जुनाच्या ठिकाणीं धैर्य व शौर्य आल्याचें, "मोडुनि दंडा फेंकुन देइन भिकार भगवी वस्त्रें। मशकापरि तीं उडविन सारी यादव चमुशस्त्रास्त्रें। आतां बळ आलें। दुर्दिन सर्वहि ते गेले।" या उद्‌गारांवरून वाटलें तरी त्याचा स्वभाव कृष्णाच्या तेजस्वी स्वभावापुढें फिका वाटतो.

नाटकांतील नायक कोण या प्रश्नाचा विचार आणखीहि एका गोष्टीनें करायला पाहिजे. आणि ती म्हणजे त्या त्या पात्रांचें नाटकांतील स्थान कोणतें, व नाटकांत तीं पात्रें किती वेळा उपस्थित रहातात ही होय. या दृष्टीनें अर्जुन व कृष्ण यांच्याकडे पाहिलें असतां अर्जुनाची उपस्थिती सर्व नाटकभर नसून तो पहिल्या, चौथ्या व पांचव्या अंकांतच दिसतो. याच्या उलट श्रीकृष्ण स्वतः किंवा आपल्या हस्तकाच्या द्वारें सर्व नाटकभर वावरत असलेला आढळतो. पहिल्या अंकांत घटोत्कच हा त्याचा हस्तक असल्यानें तो त्या अंकांतील सर्व घटनांचें श्रेय सहजच घेतो. दुसऱ्या

अंकांत तर त्याचीच भूमिका प्रधान आहे. तिसऱ्या अंकांत बलरामाला वरकरणी विरोध करून अर्जुनाला सुभद्रेच्या महालांत स्थापन करवितो. चौथ्या अंकांत रुक्मिणी कृष्णाची हस्तक बनून अर्जुनाचा कपट-संन्यास उघडकीस आणते व त्याच्या कानांत पुढील बेत सांगून मदतीचें आश्वासन देते. पांचव्या अंकांत कृष्णाचा हस्तक घटोत्कच येऊन रत्नमालेचें आणि पुढें कृष्ण येऊन, पत्राचें रहस्य उलगडतो. या सर्व घटनांवरून कृष्णाचें महत्त्व अर्जुनापेक्षां किती तरी पटीनें जास्त ठरतें व त्याच्याकडे नाटकाचें नायकत्व देण्याचा मोह वाचक-प्रेक्षकांना होणें साहजीकच आहे.

असें असलें तरी सौभद्र नाटकाचा नायक अर्जुनच समजला पाहिजे. कारण सुभद्रारूपी फलागम (फलाची प्राप्ती) त्याला होतो. मनोरथ त्याचेच पूर्ण होतात. गर्गमुनी "पार्था तुझे सर्व हेतु परिपूर्ण झाले. पण आणखी कांहीं इच्छा असली तर माग," असें त्यालाच विचारतात आणि "महाराज आपल्या कृपेनें सर्व मनोरथ पूर्ण झालेत" असें तोच म्हणतो. प्रस्तुत कथानकांतील अर्जुन कांहीसा नेभळट असला तरी एका वीरोचित सत्कृत्यासुळें तो वनवासाला निघालेला असतो आणि नांटकाच्या उत्तरार्धांत तो वीरासारखा वागतो. मग कृष्णाचें नाटकांतील स्थान कोणतें ? हे स्थान सूत्रधाराचें होय. नाटकांतील सर्व सूत्रें तो हलवितो. सौभद्र म्हणजे खरें पाहिलें असता एकप्रकारचें कृष्णकारस्थानच होय. अर्थात् यांत भर कारस्थान शब्दावर असून कृष्ण या शब्दावर नाहीं. हें कृष्णकारस्थान असलें तरी त्याचा शेवट सुमंगल झालेला दाखविला आहे.

## सौभद्र एक विनोदी नाटक

प्रस्तुत नाटक सर्वस्वी विनोदी नसलें, तरी बव्हंशी विनोदी आहे. सुरवातीच्या दोन अंकांत करुणरस आला असला तरी त्यांतहि विनोदाच्या छटा असून, शेवटचे तीन अंक जवळ जवळ विनोदीच आहेत. पहिल्या अंकांत अर्जुनाची खिन्नता, व दुसऱ्या अंकांत सुभद्रेची विरहावस्था दाखविल्यानें तेथें करुणरस सहजच उत्पन्न झाला आहे. या करुणरसाचा उत्कर्ष "वद जाऊं कुणाला शरण" या पदांत झाला आहे. तरीपण हें नाटक

सुखान्त होणार असें प्रेक्षकांना वाटत असल्यानें त्यांतील करुणरसाला धार अशी फारशी रहात नाही.

जुन्या पौराणिक नाटकांतून विनोदाच्या निर्मितीकरिता विदूषकाच्या पात्राची योजना करीत. येथेंहि तशी योजना नाटककारानें केली आहे; पण याशिवाय विनोद सर्व नाटकभर पसरविण्यांत आला आहे. नाटकांतील प्रमुख पात्रें कृष्ण, बलराम, रुक्मिणी, अर्जुन, नारद इत्यादि आपल्या आचरणानें, भाषणानें कृतीनें विनोद निर्माण करतात. विनोदाचे प्रमुख असे जे पांच प्रकार ( प्रसंगनिष्ठ, स्वभावनिष्ठ, कल्पनानिष्ठ, शब्दनिष्ठ, व रूपनिष्ठ ) ते यांत आले आहेत. त्यांतहि सिंहाचा वाटा प्रसंगनिष्ठ विनोदानें घेतला आहे. नाटकांत प्रसंगनिष्ठ विनोदाची स्थळें सुमारें वीस आहेत. येथें सर्वांचाच उल्लेख करता येणार नाहीं. परंतु त्यापैकी पांच-सहा स्थळांचा निर्देश केला पाहिजे. नाटकाच्या दुसऱ्या अंकांत कृष्ण अज्ञानाचें पांघरूण घेऊन, बलरामाच्या तोंडून सुभद्राहरणाचें वृत्त ऐकतो व बलराम त्याच्या देखत त्याच्यावरील अविश्वास प्रकट करतो. ( एकवार वाटे कीं तिजला पार्थानें नेलें। एकवार वाटे तूं तिजला कपटें लपवीलें। )

तिसऱ्या अंकांत बलराम यतीची स्तुती करतो व कृष्ण मुद्दाम निंदा करतो, हा प्रसंग विनोदी असून सरस आहे. बलराम यतीची विदेहावस्था वर्णन करीत असतांना म्हणतो, " घाली सारें मीठ तुपांतची। दुग्धीं लिंबू पिळिलें। क्षीरीमध्यें कढी घालुनी हस्तानें कालविलें। थोडें खावोनी उठला बसला फिरफिरुनी।...केवळ आम्हासारख्यांचा उद्धार करण्याकरतां ते नजरेस पडतात. " यावर कृष्ण म्हणतो, " दादा रागावू नका, माझ्या पोरबुद्धीला जें वाटलें तें मी सांगतो. जेव्हां जेव्हां वाढायातें येइ सुभद्रा ती त्या यतितें। भुलुनी पाहुनि तद्रूपातें तैसे नाना ढंग करी। पंक्तीमध्ये नसतो जरि मी। भोळे तुम्हा पाहुनि नामी। भलतें भलतें करिता स्वामी। निश्चयपूर्वक मज वाटें। " यावर बलराम म्हणतो, " आग लागोरे तुझ्या या वाणीला ! ज्याला पात्रापात्र विचार नाहीं त्याला मनुष्य म्हणण्यापेक्षां पशू म्हणणें फार चांगलें. बधिरापुढें गायन केल्याप्रमाणें, व्यर्थ मी त्या महात्म्याचें या मूर्खापुढें वर्णन केलें असें वाटतें. " ( असें म्हणून कृष्णाकडे पाठ करून

बसतो. ) यावर कृष्ण त्याचे पाय धरतो आणि बलराम शांत होतो असें वर्णन केलें आहे. अर्जुनाची सुभद्रेच्या महालांत स्थापना केल्यापासून त्याला तिचा ध्यास लागलेला असतो. ती जरा नजरेआड गेल्यावर तो अस्वस्थ होतो यामुळें दासींना त्याची सेवा करीत असतांना त्रास होतो. अशा एका प्रसंगाचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे.

**कुसमावती**—( हात जोडून ) महाराजांना काय पाहिजे आहे?

**अर्जुन**—( त्रासून ) हं! दूर उभी रहा. अग बटकीचे पोरी, किती तुझा उद्धटपणा हा? मी इथें सोवळ्यानें बसलो आहे हें तुला दिसत नाहीं?

( इतक्यांत सारंगनयना दासी प्रवेश करिते. )

**सारंगनयना**—( कुसुमावतीस ) यांना इतकें खवळायला झालें तरी काय?

**कुसुमावती**—( सारंगनयनेजवळ येऊन ) अग प्रारब्ध माझें! हें बघ, ताईसाहेब जवळ नसल्या म्हणजे हे असेच धडपड करीत असतात.

**सारंगनयना**—खरें बाई, तूर्त ही आम्हाला साडेसातीच आहे. नाहीशी होईल तो सुदीन.

**कुसुमावती**—अग चांडाळणी हळूं बोल! त्यांच्या कानावर का हें गेलें तर ते ताईसाहेबांना सांगायला कांहीं कमी करणार नाहींत.

**अर्जुन**—( सुभद्रा काय करीत आहे अशा संकेताचा हात करून ) नारायण! नारायण! ( असें म्हणतो. )

**सारंगनयना**—जळलाबाई! सगळाच यांचा नारायण! यांत माणसानें समजावें तरी काय?

चौथ्या अंकांतील रुक्मिणीचा प्रवेश फारच बहारीचा आहे. सुभद्रेचें लग्न दुर्योधनाशी ठरलें असून घरच्या केळवणाचा बेत त्याच दिवशी असल्याचें ती बुद्ध्याच खोटें सांगते. त्यावेळी रागानें व दुःखानें अर्जुनाची स्थिति मोठी चमत्कारिक होऊन, प्रेक्षकांना गंमत वाटते. रुक्मिणी त्याची सेवा करायला सिद्ध असतांना अर्जुन म्हणतो, (हातांतील गोमुखी आपटून) “ आग लागो तुझ्या सेवेला, आणि अशी ती दुःखकारक वार्ता उच्चार-

णाऱ्या त्या वाणीला ! हें पहा तूं इथून निघून गेलीस म्हणजे माझी सेवा चांगली केलीस असें मी समजेन.

**रुक्मिणी**—अग बाई हा काहीं खरा संन्यासी नव्हे. कोणी तरी मेला ढोंगी असावा. तसें नसतें तर वत्सचें लग्न ठरलेलें ऐकून याला इतका राग आला नसता.

**अर्जुन**--( बेफाम होऊन, छातीस हात लावून ) या सिंहाचा भाग तो जंबूक नेणार, असें ऐकून याला कोप आल्यावांचून कसा राहील ? असलें हें वर्तमान सांगणाऱ्या त्या जिव्हेचे तुकडे तुकडे केले नाहींत एवढेंच भाग्य समज. नारायण ! नारायण !

**रुक्मिणी**—हं, आतां तर पक्कें ध्यानांत आलें, तोच हा. अर्जुना, अरे ढोंग्या अर्जुना, आणलेल्या सोंगाची बरेच दिवस चांगलीच बतावणी केलीस; पण शेवटी मजपुढें फसलास.

**अर्जुन**--( आपल्याशी ) ही गोष्ट फार वाईट झाली. रागाच्या आवेशांत देहभान नाहींसे झाल्यामुळें असा प्रमाद घडला.

**रुक्मिणी**—कां रे दांभिका, बऱ्या गोष्टीनें तूं कोण आहेस हें कबूल होतोस, कीं भावोजींना ही गोष्ट कळवून तुझी फजिती केली पाहिजे ?

**अर्जुन**—( उठून ) वहिनी केवळ तुझ्या कपटामुळें अति दीन झालेला हा पार्थ तुला शरण आला आहे तर यास अभय दे. ( असें म्हणून तिच्यापुढें साष्टांग नमस्कार घालतो. )

पांचव्या अंकांत लंबकूर्च राक्षसानें, सुभद्रेला घेऊन यती पळून गेल्याची, बातमी सांगताच, बलराम क्रोधाविष्ट होऊन म्हणतो, " थांबा हरामखोरांनो, या अपराधाबद्दल तुम्हा सर्वत्रांस तोफेच्या तोंडी बांधून टाकतो. अरे तो कृष्ण कोठें आहे ? कोण आहे रे, माझा रथ तयार करून लवकर आणा— घालीन पालथी पृथ्वी । स्वर्ग पाडीन खालती । बघतो जातसे कोठें । दुष्ट चांडाल तो यती । ( त्यानंतर कृष्ण प्रवेश करतो व म्हणतो ), " दादा इतकें संतापायला काय झालें तरी काय ?

**बलराम**—काय ? तुला अद्याप कळलेंच नाहीं ? तो यती म्हणे सुभद्रेस घेऊन पळून गेला.

**कृष्ण**—हें भविष्य मी पूर्वींच केलें होतें, पण आपण कोठें ऐकलेंत ?

**बलराम**—( कृष्णाकडे तोंड करून, रागानें ) कृष्णा हें सर्व कपट तुझें आहे असें मी पक्कें समजतो. तूं ज्या त्या माझ्या बेतांत विघ्न करतोस. जाऊं दे. मलाहि कंटाळा आला. नको तें राज्य आणि नको तो प्रपंच. मी संन्यास घेऊन कोठें तरी निघून जातो ! कोण आहे रे, माझ्या संन्यासाची तयारी करा ! ( इतक्यांत हातांत यतिवेषाची सामग्री घेऊन एक चाकर प्रवेश करतो.)

**चाकर**—हा घ्यावा महाराज यतीचा वेष.

**बलराम**—अरे वा, कृष्णा मी संन्यास घेऊन लवकर निघून जावें म्हणून किती तयारी ठेवली आहेस तरी ही ! येथें पताकास्थान नाटककारानें साधलें आहे. इतकेंच नाहीं तर प्रसंगनिष्ठ विनोदाचेंहि हें एक पताकास्थान ठरण्याइतकें; येथील विनोद बहारीचा आहे. या सर्व विनोदी घटनांचें स्वरूप पाहिलें तर त्यांत नायक या दृष्टीनें कांही विशेष स्थान आहे असें दिसत नाहीं. कृष्ण-बलराम, रुक्मिणी–सुभद्रा, रुक्मिणी-अर्जुन, नारद-अर्जुन या सर्वच पात्रांच्या कलापूर्ण योजनेमुळें विनोद किंवा हास्यरस त्या त्या ठिकाणीं निर्माण होतो, म्हणून ॲलर्डाईस निकोल यानें असें म्हटलें आहे कीं 'Comedy is, ordinarily, heroless; the mirth arising from the juxta position of a number of characters. ( The Theory of Drama, Allardyce Nicoll, Page 178. )

प्रसंगनिष्ठ विनोदाच्या तुलनेनें स्वभावनिष्ठ व कल्पनानिष्ठ विनोदाचीं स्थळें प्रस्तुत नाटकांत थोडीं आहेत. स्वभावनिष्ठ विनोदाचीं बरीचशीं स्थळें, बलरामाविषयीं आहेत. बलराम हा शिपाईगडी असून रागीट स्वभावाचा असला तरी तो, भोळा आणि निष्पाप व प्रेमळ वृत्तीचा आहे. घटकेंत रागावणारा व घटकेंत लोभावणारा असा तो आहे. यतीची शिफारस तो कृष्णाजवळ करीत असतांना, कृष्ण त्याला विरोध करतो, आणि जसजसा तो विरोध करतो तसतशी बलरामाची यतीच्या ठिकाणची निष्ठा वाढत जाते.

आपण नसतो तर स्वामीनें भलतें भलतें केलें असतें असें कृष्ण म्हणताच तो संतापतो आणि कृष्णाकडे पाठ करून बसतो. त्याच्याकडून चूक झाल्या-बद्दल बलराम संतापेल असें न वाटून कृष्ण म्हणतो, " माझ्याकडून चूक झाल्यास तुम्ही इतकें मनापासून संतापाल असें कळलें असतें, तर मी मुळींच या विषयावर भाषणसुद्धां केलें नसतें.

**बलराम**—( कृष्णाकडे तोंड करून ) कृष्णा, मला तुझा फार दिवसां-पासून अनुभव आहे. उगीच माझ्या विरुद्ध पक्ष घेऊन मला चिडवायचें आणि मी चिडलों म्हणजे मग आपण संतोष मानायचा; यांत काय तुला थोरपणा वाटत असेल तो वाटो.

**कृष्ण** — दादा, पुरे करा, आतां तो विषय सोडून द्या. खरोखर आपणाला दुखविल्याबद्दल मला फार वाईट वाटतें. हे पहा मी तुमचे पाय धरतो. ( पाया पडतो. )

**बलराम** — ( आनंदानें आपल्याशी ) लबाडाला ही विद्या कशी उत्तम साधली आहे ! ( उघड ) पुरे पुरे, कृष्णा आतां ऊठ. गेला बरें माझा राग.

कल्पनानिष्ठ विनोद, दुसऱ्या अंकांतील सुभद्रा–रुक्मिणी यांच्या संवादांत तयार होतो. रुक्मिणी सुभद्रेची दुर्योधनाशी तिचें लग्न होणार म्हणून तिची प्रशंसा करतांच ती म्हणते, " बरं तर वहिनी, तुझ्या भावाने तुला शिशुपाल राजाला देऊ केली होती. तो काय रूपानें, पराक्रमानें किंवा ऐश्वर्यानें कमी होता म्हणून तू चोरून ब्राह्मणाबरोबर पत्र पाठवून कृष्णाला वरलेस. तें कां बरें ? याचें समर्पक उत्तर दे म्हणजे मी तुमचें सगळें ऐकतें. तिसऱ्या अंकांत बलरामदादा यतीला सुभद्रेच्या महालांत ठेवण्याचा आपला निर्धार कृष्णाजवळ बोलून दाखवितांच कृष्ण म्हणतो, " काय सुभद्रेच्या मंदिरांत त्या यतीची स्थापना करणार ? मग काय विचारतां ! चोराच्या हाती जामदारखान्याची किल्ली दिल्याप्रमाणेंच होईल. शेवटच्या अंकांत बलरामानें सुभद्रेचा हात अर्जुनाच्या हातीं देतांच रुक्मिणी तिला म्हणते, " वन्सें माझ्याशी अबोला धरलेला आतां तरी सोडालना ? शेवटी संन्याशा-लाच वरिलेंत पण !

राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ....49439...... दि: ....1995

सुभद्रा—( खाली मान घालून, लाजून ) वहिनी आता बोलशील तितकें थोडें आहे.

रूपनिष्ठ विनोदाची स्थळें अगदीच थोडी आहेत. पहिल्या अंकांत विदूषकानें, आपल्या बायकोनें यतीला टोपलीभर नारिंगें ओतून, नमस्कार केला. ही गोष्ट त्याला न आवडून तो कृष्णाला म्हणतो, " मी त्या वेळेस तिला ओळख दिली नाही, परंतु असा राग आला होता कीं या दंडकाष्ठानें त्या यतीची पाद्यपूजाच करावी. "

कृष्ण–( हंसून ) बरें, आपल्या कुटुंबानें वर तरी काय मागून घेतला ?

विदूषक—माझ्यासारखा सौंदर्यवान पति जन्मोजन्मीं असावा इतकेंच.

कृष्ण—अहाहा ! तुला सौंदर्यवान म्हणण्यास सगळ्या जगाचे डोळे फुटले पाहिजेत.

या बहारीच्या विनोदाशिवाय पौराणिक नाटकांत वावरणाऱ्या विदूषकाचा विनोदहि या नाटकांत आहे. यांतील विदूषक खादाड दाखविला आहे. कृष्णानें यतीला देण्याकरितां फळफळावळ व मिठाई दिली असतांना त्यानेंच मधल्यामधें ती खाऊन टाकली व कृष्णाकरतां मिठाई गुंडाळलेले कागद आणले ! या गोष्टीचें समर्थन तो करतो. तो म्हणतो, " मित्रा मी ज्या वेळेस त्या डोंगरांतून चुकलेल्या जनावराप्रमाणें, इकडे तिकडे भटकूं लागलों त्या वेळेस उन्हाच्या तिरिमिरीनें प्राण कसे कासावीस होऊन जातात कीं काय असें होऊं लागलें. इतक्यांत एक सुंदर झराहि आढळला. मग तेथें बसून त्या यतीस नैवेद्य दाखवून तें सगळें खाल्लें व वर पाणी प्यालों तेव्हां थोडासा तकवा आला. हें बघ, तूं तें फराळाचें दिलें नसतेंस तर (गहिंवरून) हा तुझा मित्र तेथेंच खपला असता. ( डोळे पुसतो. )

कृष्ण—तुझ्या हातीं खाण्याची जिन्नस आल्यावर ती तुझ्या पोटाबाहेर कसची रहाते ! बरें त्या नैवेद्याचा का होईना मला थोडा प्रसाद आणावयाचा होतास.

विदूषक—-नाहीं असें कसें होईल ? हे पहा त्यावर गुंडाळलेले कागद आणले आहेत. ( कागद दाखवितो आणि हंसतो. )

९३९२९

## सौभद्र–एक पौराणिक नाटक

पौराणिक नाटक या दृष्टीनें अण्णासाहेबांच्या सौभद्राकडे पहात असतांना, मूळ महाभारतांतील सुभद्राहरणाच्या सारांशरूपानें दिलेल्या कथानकाकडे आपलें लक्ष जाणें साहजिकच्च आहे. त्यांत आलेल्या प्रसंगांना किर्लोस्करांनी कशी कलाटणी दिली, त्यांत कसा बदल केला, यांचा विचार करीत असतांना, सदरहू बदलांनी मूळच्या महाभारतीय आख्यानांत कांहीं बिघाड झाला कीं तें उलट सरस व आकर्षक, नाट्यपूर्ण व बहारीचें झालें हें पाहिलें पाहिजे. मूळ महाभारताच्या अधिकृत आवृत्तींत नसलेली अर्जुनाच्या यतिवेषाची हकीगत दिल्यानें अर्जुनाच्या वीरत्वाला थोडासा गौणपणा आला आहे. तो वीरपुरुष न वाटतां नेभळट, भावनावश होणारा असा वाटतो. महाभारतांतील अर्जुन रैवतक पर्वतावरून सुभद्रेचें हरण करून नेतो, असा वीरोचित प्रसंग आहे. संन्यास घेऊन कुटिल मार्गानें त्यानें सुभद्रेचें हरण केलें नसावें असें वाटतें. पण याला एकट्या किर्लोस्करांना जबाबदार धरवत नाहीं. श्रीमद्‌भागवत, चंपूभारत, मोरोपंत आणि महाभारताची मद्रास प्रत यांतहि ही हकीगत आली आहे. नायकाच्या स्वभावाला न शोभणारा, विसदृश दिसणारा असा हा एक प्रसंग सोडला, तर नाटकांतील बाकीचे सर्व प्रसंग पौराणिक नाटकाला बाधक ठरणारे नाहींत. पांडवांचा पराक्रम वर्णन करणाऱ्या अशा महाभारताला कमीपणा आणणारा असा कोणताच भाग यांत नाहीं. रैवतक पर्वतावरील देवयात्रेच्या प्रसंगीं अर्जुनानें सुभद्रेचें हरण केलें, असें श्रीमद्‌भागवतांत ( स्कंद १०, उत्तरार्ध, अध्याय ८६ ) वर्णन केलें आहे. जवळजवळ तोच प्रकार आपल्या सौभद्रांत अण्णासाहेबांनी दाखविला आहे. अशा रीतीनें मुख्य घटना पुराणाला धरून आहे.

पौराणिक नाटकांत पुराणांत नसलेल्या गोष्टींचें वर्णन करावें कीं नाहीं, या मुद्दयासंबंधीं असें म्हणता येईल कीं, मुख्य महाभारतीय कथेला, बाध येणार नसेल तर, एकाद्या उपाख्यानाला वेगळ्या रीतीनें सजविण्याला काहींच हरकत नाहीं. सुभद्राहरण हें महाभारतांतील एक उपाख्यान आहे. अर्जुनाच्या वनवासांतील तो एक रहस्यपूर्ण, नाट्यपूर्ण, रमणीय असा भाग

आहे. त्यांत आलेला त्रिदंडी संन्यास, घटोत्कचानें केलेलें सुभद्राहरण, रत्नमाला-शेला व सुभद्रेचें पत्र यांच्या रहस्यांची योजना, रुक्मिणीनें उडविलेली अर्जुनाची फजिती, इत्यादि घटनांनी नाटकाच्या पौराणिकतेंत काहीं विशेष दोष निर्माण होत नाहीं.

पौराणिक नाटकांत पुराणकालीन वातावरण निर्माण झालें कीं नाहीं, याचाच विचार कर्तव्य असतो व असावा. कृष्ण, बलराम, नारद, अर्जुन, रुक्मिणी, सुभद्रा, गर्गमुनी हीं महाभारतांत वावरणारीं पात्रें प्रस्तुत नाटकांत असल्यानें प्रथम दर्शनीच तें एक पौराणिक नाटक आहे याची जाणीव प्रेक्षकांना होते. याशिवाय पुराणांतून आढळणारे राक्षसहि यांत आल्यानें त्याच्या पौराणिकतेंत भरच पडते. भीमपुत्र घटोत्कच याची योजना सुभद्रेला तिच्या महालांतून नाहींशी करून अरण्यांत नेणें व पुन्हा अरण्यांतून महालांत नेऊन ठेवणें या कामी केली आहे. हें काम तो मोहिनी मंत्राचा उपयोग करून करतो, असेंहि सांगण्यांत आलें आहे. अर्जुनानें घटोत्कचाला मारून कड्याखालीं लोटून दिलेलें असताहि त्याला काहीं फारशी इजा न होतां, पुन्हा तो सुभद्रेला न्यायला सज्ज होतो, असा पुराणाला शोभणारा प्रसंग किर्लोस्करांनी दाखविला आहे. घटोत्कचाचे नाटकांत दोन प्रवेश असून, ( अंक १ व ५ ) लंबकूर्च राक्षसाचा एक प्रवेश ( अंक ५ ) आहे. राक्षसांच्या या प्रवेशांनी पुराणकालीन वातावरण चांगलें निर्माण होतें; अर्थात् पौराणिक नाटक या दृष्टीनें नमुनेदार ठरणारें प्रस्तुत नाटक आहे.

## सौभद्र–एक संगीत नाटक

अण्णासाहेब किर्लोस्करांनीं मराठी नाट्यवाङ्मयांत संगीताचें एक अगदीं नवीनच युग सुरू केलें. त्यांच्या पूर्वींच्या नाटककारांच्या नाटकांतून संगीताचा मक्ता प्रायः एकट्या सूत्रधाराकडे असे. संगीत नाटकाची व निरनिराळ्या पात्रांना पद्यें वांटून देण्याची चाल सोकर बापूजी त्रिलोकेकर यांनीं सुरू केली कीं अण्णांसाहेबांनी सुरू केली, यासंबंधीचा कोठें कोठें वाद उत्पन्न केला जातो. याचें उत्तर ही चाल परिणामकारकरीतीनें आणि लोकमान्यरीतीनें

अवलंबून रहाणें स्वाभाविकच आहे. तसा विचार केला तर ‘ रुक्मिणी-हरण ’ कर्ते ( इ. स. १८६५ ) लक्ष्मण गोपाळ दीक्षित, ‘ रावणवध ’ नाटककर्ते ( इ. स. १८७० ) रावजी बाळकृष्ण लेले, ‘ पार्थप्रतिज्ञा ’कर्ते ( इ. स. १८८० च्या पूर्वी ) वासुदेव चिंतामण बापट यांच्या नाटकांतहि पद्यें एकट्या सूत्रधाराकडून म्हटली न जातां सर्व पात्रांकडून म्हटलीं जात. परंतु असें असलें तरी मध्यंतरीच्या पौराणिक नाटकांतून केवळ सूत्रधाराकडूनच हीं पद्यें म्हटलीं जात असत. ती पद्धति बदलून टाकून उत्तम गायकी पदें निरनिराळ्या पात्रांकडून म्हणवून घेण्याची प्रथा अण्णासाहेब किर्लोस्करांनींच प्रथम मोठ्या प्रमाणावर सुरू केली. आणि ती पद्धति चार पांच वर्षें सतत महाराष्ट्रभर गाजल्यानें या पद्धतीचें अध्वर्युपण साहजिकच किर्लोस्करांकडे गेलें.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांसारख्या जाणत्या विद्वानांनी देखील “ ही नवीन टूम राजश्री किर्लोस्कर यांनीं गेल्या ( इ. स. १८८० ) सालीं काढली ” ( केसरी १८८१ ) असे जे उद्‌गार काढले आहेत, त्यावरूनहि पूर्वीच्या संगीत नाटककारांचे प्रयत्न किर्लोस्करांच्या इतके यशस्वी व लोकप्रिय झाले नव्हते हें निश्चित आहे. सौभद्र नाटक हें ऑपेराच्या धर्तीवर व संस्कृत नाटकाच्या पद्धतीवर रचण्यांत आल्यामुळें त्यांत सुमारें शंभर पदें आहेत. इंग्रजी ऑपेरांत किंवा म्युझिकल प्लेमध्यें गद्य प्रायः नसतेंच. सर्व रचना संगीतांत असते. प्रसंगांचें वर्णन, संवाद हीं संगीतांत असतात. त्या मानानें संस्कृत नाटकांत गद्यभाग बराच असतो. अण्णासाहेबांनीं संस्कृत नाटकाच्या धर्तीवर सौभद्राची रचना केली असेंहि म्हणता येईल. सुमारें शंभर पानांच्या या नाटकांत, सुमारें शंभर पदें आल्यानें संगीत सौभद्र म्हणजे संगीताची मैफलच म्हणावयास हरकत नाहीं. त्या वेळच्या प्रेक्षकांना किंवा श्रोत्यांना संगीताची चांगलीच आवड असल्यानें ते असल्या मैफलीला हजर असत. हीं पद्यें ऐकताक्षणींच अर्थबोध होत असल्यानें, त्यांचा अर्थ लावायला श्रम पडत नसत. सौभद्राच्या रचनाकालीं मोरोबा वाघोलीकर, बाळकोबा नाटेकर व भाऊराव कोल्हटकर, व नंतरच्या कालांत बालगंधर्व, पंढरपूरकरबुवा, नेवरेकर, पटवर्धनबुवा, वालावलकर

इत्यादि पट्टीचे गवई उपलब्ध झाल्यानें किर्लोस्करांचें सौभद्र अत्यंत लोकप्रिय झालें. आज या नाटकाला ऐशी ब्यांशी वर्षें झालीं असूनहि, तें अजर व एक प्रकारें अमर असें ठरलें आहे. संगीत सौभद्राच्या संगीताची गोडी अवीट आहे असें म्हणता येईल.

या संगीताचें स्वरूप कसें होतें किंवा आहें, हें आतां आपण पाहूं या. सौभद्रांत आलेली सुमारें शंभर पदें निरनिराळ्या रागांचीं, चालींचीं, वृत्तांचीं अशीं आहेत. यांत भूप, झिंजोटी, लीलांबरी, बिलावल, पिलू, जोगिया, इ. राग आले आहेत. चालींत उद्धवा शांतवन कर जा, नमामि महिषासुरमर्दिनी, पडता वेणूरव कानीं, धन्य दिवस आज बाई, अभाग्याच्या घरीं बाबा कामधेनु, अजि अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला, इत्यादि मराठी चाली आहेत. तसेंच उधोजी प्यारे दिलकी दिलमें रही, कोई जाओ ब्रिजमें दधि बेचनको इत्यादि हिन्दी चाली आहेत तर, क्षीरसागर नम्मनी, आसखीय भयही पर ब्याडो, सारख्या कर्नाटकी चाली आहेत. साकी, दिंडी, अंजनीगीत इत्यादींसारखीं वृत्तात्मक गीतें आहेत. अशा रीतीनें चालींची विविधता सौभद्रांतील संगीतांत आहे.

सौभद्रांतील पद्यें दोन तीन प्रकारचीं आहेत. काहीं पद्यें गद्य मजकुराला पूरक किंवा माहितीकरितां अशी आहेत. काहीं पद्यें संवादत्मक तर काहीं पद्यें गद्यसदृश आहेत. काव्यमय, प्रसादपूर्ण, प्रसंगानुरूप अशींहि पंचवीस तीस पदें असून, सौभद्राचा लौकिक त्यांनीं वाढविला आहे. माहिती-करितां आलेल्या पदांत, ‘ झाली ज्याची उपवर दुहिता, ’ हें नटीचें पद, पहिल्या अंकांतील अर्जुनाच्या तोंडी असलेलें ‘ नाहीं झाले षण्मास मला राज्य सोडुनी । ’ हें पद, पहिल्या अंकांतील ‘ होइल कलह म्हणूनी ’ हें नारदाचें पद तसेंच त्याच्याच तोंडचें ‘ लग्नाला जातो मी द्वारका पुरा ’ हें पहिल्या अंकांतील पद, पहिल्या अंकांतील ‘ अर्जुन तर संन्यासी होउनी रैवतकीं बसला ’ हें कृष्णाच्या तोंडी असलेलें पद इत्यादि पदांचा उल्लेख करता येईल. गद्य मजकुराला पूरक अशा पदांचा नमुना म्हणजे पहिल्या अंकांत कृष्ण गर्गमुनींना उद्देशून म्हणतो, “ गुरुदैवता-प्रमाणें अन्य दैवत नाहीं हे शास्त्रवचन अगदी खरें आहे. पहा - असें

म्हणून " कोण तुजसम सांग गुरुराया। कैवारी सदया। " याचें देता येईल. माहितीवजा येणाऱ्या पदांची सुरुवात, " ऐक तर, ऐक, कारण, पहा, अरे, आतां एकच गोष्ट सांगा, असा निरोप कळवा कीं " अशा शब्दांनी वा वाक्यार्थांनी झालेली आहे. संवादात्मक पद्यांत दोन व्यक्तीं-मध्यें जी विचारांची देवघेव गद्यांत व्हावयाची त्याऐवजी ती पद्यांत झालेली दाखविण्यांत आलेली आहे. हीं सर्व पद्यें सोपी असल्यानें संवाद समजायला कांहीं हरकत येत नसे. पहिल्या अंकांतील सूत्रधार– नटीच्या प्रवेशामध्यें अशीच संवादात्मक पदें आहेत. सूत्रधार म्हणतो, ' तुझी चिंता ती दूर करायातें। करुनि आलो सखे लग्न निश्चयातें। ' त्यावर नटी विचारते, " जन्म घेति ते कोणच्या कुलीं। वसति नित्य ते कोणत्या स्थलीं। जनक जननिही असति कीं तया। द्रव्य किति दिलें। दिवस किति वया। " पहिल्या अंकांत अर्जुन–नारदाच्या संवादांत नारद विचारतो, " बरें पण पार्था, तूं या दंडास कसा पात्र झालास?" त्यावर अर्जुन म्हणतो, " ऐकावें महाराज, चोरांनीं निज धेनु चोरिल्या। धांवा धांवा ऐसें। शब्द करित ते ब्राह्मण आलें माझ्या द्वारा सरिसे। आश्वासुनि त्यांना झालों तयार रिपुदमना। " असें सांगतो. पांचव्या अंकांत सुभद्रा व अर्जुन यांचा संवाद असाच पद्यात्मक आहे. सुभद्रा रैवतक पर्वताला उद्देशून म्हणते, " गिरिवर सौदागिर आणि सिंधुपथें नौका भरुनी। पुष्पयुवतिचीं चित्रें मांडी विकण्यास्तव बाजार वनीं। बघुनि वाटतें मन्मनीं या समयीं। " त्यावर अर्जुन म्हणतो, " सुभद्रे, तुझी कल्पना माझ्या मतें अगदी बरोबर जुळाली,—— त्या चित्रांतुनि सुंदर पुतळी निवडुनि मी करिं घेवोनी। जात तया सन्निध पुसाया मोल किती वद रे म्हणुनी ! "

कांहीं पद्यें अगदी गद्यसदृशहि आहेत. सौभद्र नाटक ऑपेराच्या धर्तीवर असल्यानें आणि ऑपेरा सामान्यपणें पद्यप्रधान असल्यानें गद्यांत लिहिला तरी चालेल असा मजकूरहि पद्यांत आला आहे. अशा पद्यांत, पहिल्या अंकांतील कृष्णाच्या तोंडी घातलेलें, " गर्गगुरुतें घेतलें वश करोनी। अखेरीची ठरविली तिथी त्यांनी ! " दुसऱ्या अंकांतील बलरामाच्या तोंडी, " नाहिं सुभद्रा या वार्तेतें जेव्हां आयकिलें ! सर्वांगाची लाही होउन

काळिज चरचरलें !" दुसऱ्या अंकांतीलच बलरामाच्या तोंडी, "घाली सारें मीठ तुपांतची दुग्धी लिंबू पिळिलें ! क्षीरीमध्यें कढी घालुनी हस्तानें कालविलें !" तसेंच दुसऱ्या अंकांतलि, "रचिला ज्याचा पाया त्याची बरी उभारणी झाली। विघ्नावांचुनि जुळलें सर्वहि मोठी चिंता सरली ! नाहीं भय उरलें। बहुधा सर्व ताडिस गेलें।" या पद्यांचा करता येईल.

ज्या पदांच्यामुळें सौभद्राची गणना उत्कृष्ट संगीत नाटक म्हणून केली जाते, ज्या पदांचे स्वर गेलीं ऐशीं वर्षें झालीं तरीहि रसिकांच्या कानांत घुमत आहेत, त्या पद्यांचा आपण आता विचार करूं या. अशा पदांत पहिल्या अंकांतील नटीच्या तोंडी 'वैशाख मासिं वासंतिक समय शोभला,' अर्जुनाच्या तोंडी असलेलें, 'गंगा नदि ती सागर सोडुनी,' नारदाच्या तोंडी असलेलें, 'राधाधर मधु मिलिंद, जयजय रमारमण हरि गोविंद' आणि 'पावना वामना या मना,' अर्जुनाच्या तोंडी असलेलें 'सुवर्ण केतकी परि जो दिसतो वर्ण नसे दुसरीचा;' दुसऱ्या अंकांतील सुभद्रेच्या तोंडी 'वद जाऊं कुणाला शरण करी जो हरण संकटाचें;' त्याच अंकांतील सुभद्रेच्या तोंडी 'अरसिक किति हा शेला,' 'बघुनि उपवना विरहाग्नीची ज्वाळा भडके उरीं' हें विरहावस्थेचें वर्णन करणारें पद, तिसऱ्या अंकांतील कृष्णाच्या तोंडीं योजिलेलें 'कर पाशीं या तनूला बांधुनि करि शिक्षेला' हें शृंगारात्मक पद, पांचव्या अंकांतील संथ लयींत म्हटलें जाणारें 'पुष्प पराग सुगंधित शीतल अतिमंद चरे वन वायू हा' आणि सुभद्रेच्या तोंडी 'गिरिवर हा सौदागिर' आणि 'सिन्धुपथे नौका भरुनी' इत्यादींचा करता येईल. हीं पदें काव्यमय, प्रसंगानुरूप, सुंदर कल्पनांनी नटलेली व प्रसादपूर्ण अशी असून, मधुर व विविध रागदारीनें नटलेली आहेत. अण्णासाहेबांनी ठेवलेला संगीताचा हा वारसा महत्त्वाचा व मौलिक असा आहे.

या पदांना थोडेसें अनौचित्याचें व कालविपर्यासाचें गालबोट लागलें आहे. पहिल्या अंकांत सुभद्रा संकटांत असतांना स्वगत भाषण तर करतेच पण 'प्रियकर माझे भ्राते मजवरी निष्ठुरता हृदयीं धरिती' हें पदहि

म्हणते ! सुभद्रा मूर्च्छित पडली असतांना तिला शुद्धीवर आणण्याकरितां त्वरित पाणी आणण्याच्या ऐवजीं, 'दैवयोग दुर्विपाक आजि जाहला। पुण्यबळें प्राप्त लाभ मीच दवडिला।' तसेंच 'तुज दिधलें दुःख मी म्हणूनी कां मजवरि बसलिस रुसुनी।' अशीं दोन पदें रागदारीची म्हणतो !

कालविपर्यासाचा दोष असाच दोन पदांत झाला आहे. गुरुदैवताचें वर्णन करितांना कृष्ण म्हणतो, "कोण तुजसम सांग मज गुरुराया......तारक बलवंता।" याच्यांत अण्णासाहेबांचा स्वतःचा जो 'बलवंता' म्हणून उल्लेख आहे तो लेखक कृष्णकालीन नसल्यानें दोषास्पद आहे. तसेंच नारदाच्या तोंडी 'राधाधर मधु मिलिंद जय जय रमारमण हरि गोविंद !' या पदाच्या शेवटीं बलवत् स्तुस्तितें न निंद' असा जो लेखकाच्या नांवाचा उल्लेख आहे तो नारदकालांत लेखक उपस्थित असणें शक्य नसल्यानें दोषार्ह वाटतो. हे दोष सूर्यावरील डागाप्रमाणें असल्यानें, अण्णासाहेब किर्लोस्करांच्या संगीत सौभद्राचा दर्जा यांनी कमी होत नाहीं. संगीत नाटककार या नात्यानें त्यांचा लौकिक जो आहे त्याला यांनी कांहीं बाध येणें शक्य नाहीं. संगीत नाटकाची परंपरा त्यांनी जी सुरू केली ती आदरणीय, अनुकरणीय अशीच होती व आहे. या बाबतींत अण्णासाहेब किर्लोस्कर यांनीं शामराव नारायण भेंडे-कृत 'संगीत द्रौपदी' नाटकाच्या, स्वतः लिहिलेल्या ता. ७ मे १८८४ च्या अभिप्रायांत जें म्हटलें आहे तें महत्त्वाचें वाटतें म्हणून पुढें देत आहे. "नाटककला आपल्या अंगभूत गायनकलेसह लोकांच्या (प्रेक्षकांच्या) व नाटककर्त्यांच्या अज्ञानामुळें लयास इतकी गेली होती कीं तिची मागें खूण देखील उरली नव्हती; परंतु इंग्लिश नाटकाच्या पद्धतीस अनुसरून, त्यास आपल्या थोड्याशा गायनाचा डूब देऊन पारशी लोकांनी तिला पुन्हा थोडीशी जीवनकला दिली. अदमासे दोन तीन वर्षांपूर्वी सदर पारशी लोकांचा अभिनय पाहून माझ्या मनांत ही संगीत नाटकाची कल्पना उद्‌भवून तदनुसार एकदोन नाटकें रचलीं जाऊन तिचे प्रयोगहि बहुतेक ठिकाणीं झाले व ते झाल्यापासून बरेच लोक त्यांतील पद्यें गुणगुणूं लागले. एकंदर लोकांची रुचि बदलून जाऊन मागील धांगडधिंगा बंद होण्यास अशा पद्धतीचीं नाटकें रचणारे पुष्कळ झाले पाहिजेत."

## सौभद्रांतील नाट्यप्रसंग

नाट्यप्रसंग म्हणजे असा प्रसंग कीं ज्यांत चमत्कृति आहे, कलाटणी आहे, एक प्रकारचा संघर्ष आहे, अटीतटीचें वर्णन आहे, किंवा आकर्षक कृति आहे. सौभद्रांत असले नाट्यप्रसंग पंचवीस–तीस आहेत. त्या सर्वांचा विचार करावयाचा म्हटल्यास निष्कारण विस्तार होईल म्हणून वेंचक अशा कांहीं प्रसंगांचें वर्णन खाली केलें आहे. सौभद्र नाटकाची सुरुवातच एका नाट्यप्रसंगानें झाली आहे. सूत्रधार द्वारकेंतील होऊं घातलेल्या लग्न-समारंभाची माहिती देत असतांना, असें म्हणतो, "झाली उपवर श्रीकृष्णाची भागिनी सुभद्रा तिजला। दुर्योधन भूपासि हलधरें द्यायां निश्चय केला।" तीर्थयात्रेनिमित्त फिरत असलेल्या अर्जुनानें ऐकतांच खवळून म्हटलें "हा मूर्खा भरतकुलाधमा! धनंजयवीरास द्यायची असें म्हणायचें सोडून त्या अंधपुत्राचें नाव घेण्यास तुला शंका कशी रे नाहीं आली." दुसरा नाट्यप्रसंग अर्जुनानें विषादपूर्ण अवस्थेंत नारदाला आपला संन्यास घेण्याचा विचार व्यक्त करून, त्यानें सुचविलेल्या त्रिदंडी संन्यासाची कल्पना स्वीकारतांच, पडद्याआडून यादव सेनापती सात्यकीमहाराजांची घोषणा त्याला ऐकू येते. या घोषणेंत सुभद्रेचा विवाह ज्या दिवशीं व्हावयाचा असतो त्या दिवशीं ती एकाएकी अंतर्गृहांतून नाहींशी झाल्याचें व रैवतक पर्वतांतील अरण्यासभोंवती तिचा शोध घेण्याकरितां सैन्य रवाना झाल्याचें जाहीर केलें जातें. या घोषणेनें अर्जुनाला आनंद होतो व त्याचा दग्ध झालेला आशावृक्ष सुवार्तारूपी जलवृष्टीनें पुन्हा अंकुरित होतो. याच अंकांत घटोत्कच राक्षसाचा प्रवेश असून त्यांत राक्षसानें सुभद्रेला आणून जिथें अर्जुन आहे अशा ठिकाणीं तिला ठेवणें, अर्जुनाची व त्याची झोंबाझोंबी होणें, त्याचें अदृश्य होणें व पुन्हा प्रवेश करून सुभद्रेला नेणें या सर्व गोष्टींत भरपूर नाट्य आहे. हा सबंध अंकच नाट्यमय प्रसंगांनी भरलेला आहे.

दुसऱ्या अंकांतील सुभद्रेच्या आणि कुसुमावतीच्या संवादांत सुभद्रेनें अर्जुनाला दिलेला शेला परत तिच्याकडे आला व त्या शेल्यामुळें तिला अर्जुनाची आठवण होऊन ती शेला हातांत घेऊन व तो खाली आपटून म्हणते, "सखे या शेल्याचा मला असा राग आला आहे कीं याचे फाडून

तुकडे करून टाकावेत." शेल्याचे तुकडे करून टाकण्याचें कारण कुसुमावतीनें विचारतांच 'अरसिक किति हा शेला' हें रम्य कल्पनेनें नटलेलें पद ती म्हणते. हाहि प्रसंग नाट्यमय आहे. दुसऱ्या अंकांतील सुभद्रा व रुक्मिणी यांच्या संवादांत दुर्योधनाची शिफारस रुक्मिणी करीत असतांना सुभद्रा म्हणते, "परदुःख शीतल आहे ग वहिनी. आता मी बोलले तर दुसऱ्याची वर्में काढता असें म्हणशील. तुझ्या भावानें तुला शिशुपाल राजाला देऊ केली होती. तो काय रूपानें, पराक्रमानें किंवा ऐश्वर्यानें कमी होता, म्हणून तू चोरून ब्राह्मणाबरोबर पत्र पाठवून कृष्णाला वरलेंस. तें कां बरें, याचें समर्पक उत्तर दे म्हणजे मी तुमचें सर्व ऐकते.

तिसऱ्या अंकांत कृष्ण-बलरामाच्या संवादांत, कृष्ण यतीच्या लीलांचा समाचार घेत असतांना, बलरामाला तें न आवडून तो म्हणतो, "आग लागो रे तुझ्या या वाणीला! ज्याला पात्रापात्र विचार नाही, त्याला मनुष्य म्हणण्यापेक्षा पशू म्हणणें फार चांगलें. बधिरापुढें गायन केल्याप्रमाणें व्यर्थ मी त्या महात्म्याचें या मूर्खापुढें वर्णन केलें असें वाटतें." असें म्हणताच बलराम कृष्णाकडे पाठ करून बसतो. या नाट्यमय प्रसंगाच्या शेवटीं कृष्ण बलरामाचे पाय धरून त्याचा राग घालवितो असें वर्णन आहे. याच अंकांत बलरामानें यतीस सुभद्रेच्या मंदिरांत स्थापना करण्याचें जाहीर करतांच कृष्ण म्हणतो, "काय सुभद्रेच्या मंदिरांत त्या यतीची स्थापना करणार? मग काय विचारतां, चोराच्या हाती जामदारखान्याची किल्ली दिल्याप्रमाणेंच होईल."

चौथ्या अंकांत, रुक्मिणीनें यतिरूप अर्जुनाचें खरें स्वरूप प्रकट करतांच अर्जुन घाबरला व तिनें आलेल्या पेंचप्रसंगांतून बाहेर कसें पडावें हें सांगताच आनंदानें आपले विचार मांडले ते असे. "मोडून दंडा फेकुन देइन भिकार भगवी वस्त्रें! मशाकापरि तीं उडविन सारी यादव चमुशस्त्रास्त्रें! आतां बळ आलें। दुर्दिन सर्वहि ते गेले।"

पांचव्या अंकांत यतीनें सुभद्रेचें हरण केल्याची वार्ता बलरामानें कृष्णाला सांगतांच कृष्ण म्हणतो, "हे भविष्य मी पूर्वींच केलें होतें पण आपण कुठें ऐकलेंत?" यावर बलराम म्हणतो, "कृष्णा हें सर्व कपट तुझें आहे असें

मी पक्कें समजतो. तूं ज्या त्या माझ्या बेतांत विघ्न करतोस. जाऊं दे. मलाहि कंटाळा आला. नको तें राज्य आणि नको तो प्रपंच. मी संन्यास घेऊन कोठें तरी निघून जातों. कोण आहे रे, माझ्या संन्यासाची तयारी करा !"

हें त्याचें बोलणें संपतांच अर्जुनानें टाकून दिलेल्या यतिवेषाची सामग्री घेऊन एक चाकर प्रवेश करतो आणि म्हणतो, "हा घ्यावा महाराज यतीचा वेष." त्यावर बलराम उपरोधानें म्हणतो, "अरे वा कृष्णा, मी संन्यास घेऊन लौकर निघून जावें म्हणून किती तयारी ठेवली आहेस तरी ही." याच अंकांत सुभद्रेचें हरण करून अर्जुनानें तिला नेली असतां एका सुंदर तरुण राजपुत्रानें तिला सोडविली व तिला घेऊन तो बलरामाकडेच येत आहे असें सात्यकीनें म्हणतांच बलराम म्हणतो, "असा ज्यानें मजवर उपकार केला त्याला मी आपली सुभद्रा अर्पण केली." कृष्ण त्यावर म्हणतो, "दादा विचार करून बोला. दुर्योधनास वचन गेलेलें आहे." इतक्यांत सात्यकी, अर्जुन-सुभद्रेसहित प्रवेश करतांच एकदम बलराम म्हणतो, "शाबास ! वीर शिरोमणी शाबास ! तूं केलेल्या उपकाराबद्दल ही माझी भगिनी मी तुला अर्पण केली. (अर्जुनास ओळखून) अरेरे घात झाला. न जाणता मी दिलेलें वचन कांही खरें नव्हे. (रागानें) अरे चांडाळा, अधमा पार्था, अशा कपटानें सुभद्रा मिळवूं पहातोस काय ! तर सुभद्रेबद्दल घे या गदेचा प्रहार."

## सौभद्रांतील रसोत्कट - भावोत्कट प्रसंग

संगीत सौभद्रांत नाट्यप्रसंगासारखेंच भावोत्कट-रसोत्कट प्रसंगहि अनेक आहेत. सौभद्रांतील रसवत्ता असल्या प्रसंगानें व्यक्त होते. नमुन्या-दाखल येथें कांहीं प्रसंगांचा उल्लेख केला आहे. पहिल्या अंकांत करुणा, शृंगार व हास्य या रसांचा परिपोष केला आहे. सुभद्रा दुर्योधनाला दिली जाणार या वार्तेनें अर्जुनाचा प्रथम रोष व त्यानंतर शोक प्रकट करण्यांत आला आहे. अर्जुनाची विरहाची भावना, त्यानें केलेली आत्मनिर्भर्त्सना चांगल्या रीतीनें दाखविली आहे. नारदाच्या पात्राकडून खोडकर सहानु-भूतिपर हास्यमिश्रित असा भाव दाखविला आहे. सुभद्रेच्या अचानक

झालेल्या उपस्थितीनें शृंगारभावहि मध्यमप्रतीचा तयार झाला आहे. दुसऱ्या अंकांत हास्य व करुणरस यांचा आविर्भाव सरस आहे. कृष्ण-विदूषक यांच्यामुळें हास्यरस तयार होतो. बलराम व कृष्ण यांच्यापासूनहि हास्याचा भाव व्यक्त होतो. हास्यरसापेक्षा करुणरसाचा परिपोष सुभद्रेच्या विरहावस्थे-पासून होतो. सुभद्रेची विरहाची भावना चांगल्या रीतीनें व्यक्त झाली आहे. 'वद जाउ कुणाला शरण,' 'अरसिक किति हा शेला,' 'किति सांगु तुला मज चैन नसे.' इत्यादि पदांतून करुणरसाचा परिपोष नाटककारानें साधला आहे. 'परदुःख शीतळ आहे' सारख्या वाक्यांवरून सुभद्रेच्या विरहाची कल्पना चांगली येते. तिसऱ्या अंकांत हास्य व शृंगार रसाची भावना बहारीची वर्णन करण्यांत आलेली आहे. कृष्ण व बलराम यांच्या यतिविषयक संवादामुळें हास्यरस चांगला तयार होतो. यतीला सुभद्रेच्या महालांत ठेवणें म्हणजे चोराच्या हाती जामदारखान्याची किल्ली देण्यासारखें आहे. अशा अर्थाच्या वाक्यांवरून हास्यरस निर्माण होतो. परंतु या अंकाचें मुख्य वैशिष्ट्य म्हणजे शृंगाररस होय. कृष्ण-रुक्मिणी यांच्या प्रवेशांतून अभिजात किंवा सात्विक शृंगाराची भावना चांगली व्यक्त झाली आहे. 'नच सुंदरि करुं कोपा', 'करपाशीं या तनुला' इत्यादि पदांतून शृंगाररसाचा परिपोष चांगला करण्यांत आला आहे. चौथ्या अंकांत मुख्यतः हास्यरसाचा आविर्भाव करण्यांत आला आहे. सुभद्रा-रुक्मिणी, अर्जुन-दासी व अर्जुन-रुक्मिणी यांच्या संवादांमुळें हास्यरस निर्माण होतो. अर्जुनाचें कपट रुक्मिणीनें उघडें केल्यामुळें आगतिक बनलेला अर्जुन "कसें करूं तें सांग, पण अर्जुना, अर्जुना असें म्हणूं नकोस ग" असें जेव्हां बोलतो त्या वेळीं प्रेक्षकांत हास्यकल्लोळ निर्माण होतो. पाचव्या अंकांत हास्य, वीर व शृंगार अशा तिन्ही रसांचा परिपोष झाला आहे. अर्जुन–सुभद्रा यांच्या प्रवेशानें शृंगाररस साधला आहे; तर धनुष्य-बाणाच्या प्राप्तीनें बेफिकीर बनलेल्या अर्जुनाच्या भाषणांत वीररस प्रामुख्यानें दिसतो. बलरामाच्या उपस्थितीनें वीररसापेक्षां हास्यरसच जास्त तयार होतो. सुभद्रेचें रक्षण करणाऱ्या अर्जुनेतर वीरशिरोमणीचें अभिनंदन करून त्याला आपली बहीण अर्पण करणाऱ्या बलरामानें, तो वीरशिरोमणी अर्जुनच

...ठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

आहे असें कळतांच, “ अरे चांडाळा, अधमा पार्था, अशा कपटानें सुभद्रा मिळवूं पाहतोस काय ? तर सुभद्रेबद्दल घे या गदेचा प्रहार. ” या वाक्यानेंहि प्रेक्षकांत हास्यकल्लोळ निर्माण होतो. अशा रीतीनें नाटककारानें विविध भावनांचा प्रसंगानुरूप परिपोष केला असल्यानें संगीत सौभद्र याहि बाबतींत एक सरस नाट्यकृति कशी आहे हें कळतें.

## सौभद्राचें संविधानकरचनाचातुर्य

सौभद्रांत ठळकपणें लक्षांत येणाऱ्या ज्या कांही गोष्टी आहेत त्यांत संविधानकरचनाचातुर्य ही एक आहे. अगदी नटी-सूत्रधाराच्या प्रास्ताविक प्रवेशापासून ते अर्जुन-सुभद्रेच्या पाणिग्रहणाच्या शेवटल्या प्रवेशापर्यंत सर्व रचना कशी सुसूत्र झाली आहे. नाटकांतील भावी विवाहाची छाया नटीच्या स्वकन्येच्या विवाहविषयक चिन्तातुर उद्‌गारांवर दाट पडली आहे. आणि ज्याप्रमाणें सूत्रधार नटीला सांगतो, “ कन्येपूर्वीं तिच्या पतीतें विधि निपजवितो भार्ये । ईशाज्ञेविण कांहि न होती सृष्टींतिल ती कार्यें । म्हणुनी स्वस्थ रहा । विधिघटनेची वाट पहा । ” त्याप्रमाणें वाचक-प्रेक्षकहि विधिघटनेची मौज पहायला सिद्ध होऊन नाटकाच्या वाढीकडे अवधान पुरवितात. ज्या प्रवेशांमुळें कथासूत्र पुढें ढकललें जातें, किंवा ज्यांच्यामुळें मनोहर खटका किंवा द्वंद्व निर्माण होतें, किंवा ज्यांच्यामुळें कथासूत्रांची गुंतागुंत उकलली जाते, किंवा क्वचित् ती अधिकच होते अशा प्रवेशांचा यांत भरणा आहे. या दृष्टीनें पहातां, पहिल्या अंकांतील घटोत्कच-सुभद्रेचा प्रवेश हा महत्त्वाचा मानावा लागतो. कारण याच प्रवेशांत सुभद्रेनें अर्जुनाला दिलेल्या शेल्याची व अर्जुनानें सुभद्रेला दिलेल्या रत्नमालेची अदलाबदल होऊन सुभद्रा अर्जुनाच्या दृष्टीस पडते व त्याला चटका लावून नाहीशी होते. तिसऱ्या अंकांतील श्रीकृष्ण व बलराम यांचा मुख्य प्रवेश आणि श्रीकृष्ण व रुक्मिणी यांचा मनोहर प्रवेश हे दोन्ही फारच महत्त्वाचे आहेत. याच प्रवेशांत कृष्ण आपल्या अपूर्व चातुर्यानें आपलें ईप्सित तडीस नेतो. त्याचप्रमाणें रुक्मिणीला आपल्या कटात सामील करून तिची मदत मिळवितो. कृष्ण हा या नाटकांतील सूत्रधार मानल्यास त्याच्या सूत्रांचें सुंदर जाळें याच प्रवेशांत निर्माण होतें. चौथ्या

अंकांतील अर्जुन व रुक्मिणी यांचा प्रवेश तर फारच काव्यमय व बहारीचा आहे. अर्जुनाचें सुभद्रेविषयींचें प्रेम, त्याचा उतावळेपणा, त्याचा नाटकीपणा, त्याचा आत्मविश्वास तसेंच रुक्मिणीचा विनोदी स्वभाव व प्रेमळपणा हीं सर्व या प्रवेशांत व्यक्त झालीं आहेत. रुक्मिणीचा महत्त्वाचा कानमंत्र याच प्रवेशांत अर्जुनाला मिळतो. पांचव्या अंकांतील अर्जुन सुभद्रा यांच्या परस्पर ओळखीपेक्षांहि बलराम वैतागानें संन्यास घ्यायला निघतो तो प्रवेश फारच चटकदार आहे. "कोण आहे रे! माझ्या संन्यासाची तयारी करा" असें बलरामानें म्हणतांच एक चाकर हातांत अर्जुनाची यतिवेषाची सामग्री घेऊन प्रवेश करतो व म्हणतो, "हा घ्यावा महाराज यतीचा वेष." केवळ काकतालीय न्यायानें बलरामाजवळ येणाऱ्या चाकरामुळें त्या प्रवेशाला फारच मनोरमता आली आहे. त्याचमुळें त्या प्रवेशाला फारच मनोरमता आली आहे. त्याचमुळें बलरामाचें कृष्णाविषयीं मन कलुषित बनतें. सात्यकीनें सांगितलेल्या सुभद्रारक्षणाच्या हकीगतीनें तर हाच प्रवेश पुढें इतका रंगतो की प्रवेशाचा उत्कर्ष बिन्दु व नाटकाचा शेवट एकाच वेळी होतो. अशा रीतीनें अण्णासाहेबांनी प्रेक्षकांचें कुतुहल शेवटपर्यंत टिकविणारी कथानकाची रचना केली आहे.

## सौभद्रांतील स्वभावरेखन

सौभद्रांतील स्वभावरेखनासंबंधी प्रथम एक गोष्ट लक्षांत ठेवायला पाहिजे, ती अशी कीं अण्णासाहेबांनी आपल्या कथेचा सांगाडा ज्या महाभारतांतून घेतला त्यांतच त्यांतील पात्रांचे स्वभाव दर्शविलेले आहेत. यामुळें त्यांना त्यांत आमूलाग्र बदल करणें शक्य नव्हतें. श्रीकृष्ण-बलराम, सुभद्रा-अर्जुन इत्यादिकांचें स्वभाव ठरून गेल्यासारखेच होते. त्यांत बदल करून चालण्याजोगें नसल्यानें नाटककाराच्या कल्पनाशक्तीला त्यांत फारसा वाव नाही. असें असूनहि किर्लोस्करांनीं श्रीकृष्ण, रुक्मिणी, बलराम, सुभद्रा यांच्या स्वभावांचें आविष्करण चांगल्या तऱ्हेनें केलेलें आहें. श्रीकृष्ण प्रेमळ, धूर्त, हुषार, कावेबाज व शीघ्र बुद्धीचा असून तोच वस्तुतः नाटकांतील नायक आहे. कारण त्याच्याच कारस्थानामुळें कथानक पुढें ढकललें जातें.

बलराम हा साधा-सीधा शिपाई गडी आहे. त्याला डावपेंच मुळींच माहीत नाहीत. मूळ महाभारतांतील कथेंत रुक्मिणीला कांहीच महत्त्वाचें स्थान नाहीं. किर्लोस्करांनी तिच्यावर मोठीच जबाबदारी टाकली आहे. कृष्णाच्या मनांत सुभद्रेची योजना बिंबविण्याची कामगिरी तिच्यावर सोपविण्यांत आली आहे. अर्जुनाला महत्त्वाचा कानमंत्र ( अंक ४ ) तिच्याचकडून देवविण्यांत आला आहे. तिच्या मानानें सुभद्रेचें पात्र फिकें वाटतें. तिचा बहुतेक काळ शोक करण्यांतच जातो. तिच्या ठिकाणीं एकनिष्ठा व बाणेदारपणा हे गुण आहेत. अर्जुनाचें पात्रहि सुभद्रेप्रमाणेंच फिकें वाटतें. नायक या पदवीला पात्र होण्याजोगी त्याच्या हातून कांहीच कामगिरी होत नाही.

स्वभावरेखाटनाच्या बाबतींत आणखीहि एक मुद्दा सांगण्याजोगा आहे. अण्णासाहेबांनी घटोत्कचादि राक्षसांचा राक्षसीपणा जसा कमी केला, तसाच श्रीकृष्णादि देवांचा देवपणाहि कमी केला. राक्षसांना त्यांनी सौम्य बनविलें व देवांचें मानुषीकरण केलें. सौभद्रांतील पात्रें दैवी असूनहि तीं आपणास आपल्यासारखींच वाटतात. पूर्वींच्या पौराणिक नाटकांत मानुषीकरणाची ही क्रिया अस्तित्वांत नसे. त्यामुळें त्यांतील देव व इतर पात्रें प्रेक्षकांपेक्षां फार वरच्या कोटींतील वाटत. अशा पात्रांविषयी आदर व भीती ही वाटली तरी त्यांच्याविषयी आपलेपणा वाटणें शक्य नसतें. अण्णासाहेबांनी हें ओळखून श्रीकृष्ण, अर्जुन, बलराम, रुक्मिणी यांना सामान्य मानवांप्रमाणेंच वागायला लावलें आहे. या बाबतींत नमुन्यादाखल श्रीकृष्ण–रुक्मिणी, रुक्मिणी–सुभद्रा, अर्जुन–रुक्मिणी, बलराम–कृष्ण, नारद–अर्जुन यांचे संवाद पहाण्याजोगे आहेत.

पहिल्या अंकांत नारद म्हणतो, “ अर्जुना, आतां याविषयीं फार विचार करूं नकोस. जसजसा कोळसा उगाळशील तसतसें काळेंच निघेल ... ” श्रीकृष्णाविषयींचा हा उल्लेख आणि त्यांतील कोळसा उगाळण्याची कल्पना मानवी आहे. याच अंकांत सुभद्रा व अर्जुन यांचा संवाद पहाण्याजोगा आहे. सुभद्रा म्हणते, “ तर काय मी या घोर अरण्यांत आहे ? मला इथें कुणी आणली ? ” त्यावर अर्जुन म्हणतो, “ तें कसें काय झालें हें मला सांगवत नाहीं. ” त्यावर सुभद्रा गहिवरून म्हणते, “ हाय

हाय ! हें कांही माझ्यानें सहन करवत नाही. दादा वहिनी आदीकरून सर्वजण मला म्हणतील, तू खास मुहूर्त चुकविण्याकरितां हे साहस केलेंस." यांतील मुहूर्त चुकविण्याची कल्पना केवळ मानवी आहे.

दुसऱ्या अंकांतील कृष्ण-बलराम यांच्या संवादांत, कृष्णाविषयी शंका येऊन बलराम त्याला म्हणतो, "कृष्णा काय सांगू ? असेंहि मनांत आलें ......एकवार वाटे तूं तिजला कपटें लपवीलें... आणि ती जेव्हां पुन्हा निजलेली मिळाली असें ऐकलें त्या वेळेस तर हे तुझेंच कपट असावें अशी खात्री झाली." यांतील कपटाची कल्पना सर्वथैव ऐहिक आहे. याच अंकांतील कृष्ण-सुभद्रा संवाद उल्लेखनीय आहे. कृष्ण म्हणतो. "ताई, हा एवढा चातुर्मास संपला कीं पहिल्या मुहूर्तांसच तूं त्या सार्वभौम राजा दुर्योधनाची पट्टराणी होणार. मग केवढा ताईला डौल येईल ! आमच्या बरोबर बोलशील तरी कां नीट मग ?" सुभद्रेला खिजविण्याची ही तऱ्हा आपल्यासारखीच असल्यानें कृष्णाविषयीं आपणाला आपलेपणा वाटतो. याच अंकांत सुभद्रा-रुक्मिणी यांच्या संवादांत पुढील मजकूर आला आहे. सुभद्रा रुक्मिणीला म्हणते, "पुरे पुरे वर्णन, नवराबायकोंनीं जसा काय एकच कित्ता गिरविला आहे. वहिनी तो इंद्रापेक्षांहि भाग्यवान असला तरी, मला नको असल्यावर तेथें आग्रहानें मला देऊन माझ्या जन्माची माती कां करतां ?" यांतील कित्ता गिरविण्याची कल्पना मनुष्य लोकांतीलच वाटते. तिसऱ्या अंकांतील कृष्ण-बलराम यांचा संवाद असून, कृष्ण बलरामास अर्जुनाविषयीं म्हणतो, "काय सुभद्रेच्या मंदिरांत त्या यतीची स्थापना करणार ? मग काय विचारतां ! चोराच्या हातीं जामदारखान्याची किल्ली दिल्याप्रमाणेंच होईल." यांतील चोराची आणि जामदारखान्याची कल्पना अशीच मानवी आहे.

याच अंकांतील कृष्ण-रुक्मिणी यांच्या संवादांत ज्या भावना व्यक्त झाल्या आहेत त्या आपल्या समाजांतीलच वाटतात. कृष्ण रागावल्यासारखें करून रुक्मिणीला म्हणतो, "पुरे पुरे. मी सारें समजलों. तुझ्या मनांतून माझा व दादांचा बिघाड यावा व स्वतंत्रपणानें आपण निराळें रहावें. खरोखर प्रपंचांत जें बंधुबंधूंचें वांकडें पडतें याला कारण स्त्रियाच, यांत संशय नाहीं. रुक्मिणी,

तुला जर याच विषयावर आणखी बोलायचें असेल तर मला येथें क्षणभर देखील बसायचें नाहीं. ''

चौथ्या अंकांतील अर्जुन–रुक्मिणी यांचा संवाद असून कपटवेष घेतलेल्या अर्जुनाला ओळखतांच आणि त्याला 'अर्जुन' म्हणून संबोधतांच तो म्हणतो, " कसें करूं तें सांग पण अर्जुना अर्जुना असें म्हणूं नकोस ग. '' अर्जुनाचें काकुळतीला येणें हें सर्वस्वी आपणाला पुनःप्रत्यय घडवून आणणारें आहे.

पांचव्या अंकांतील सुभद्रा व राक्षस यांचा संवाद हा असाच प्रत्ययकारी आहे. त्यांत घटोत्कच म्हणतो, " अर्जुनकाका व सुभद्राकाकी, या उभयतांच्या चरणीं हा बालक घटोत्कच वंदन करितो. '' या उद्गारांत राक्षसीपणाचा कोठेंहि वास नाहीं.

## सौभद्रांतील संवाद

उत्कृष्ट नाटककाराच्या नाटकांत इतर अनेक गोष्टींबरोबरच संवादांतील चटकदारपणा असावा लागतो. नाटकाचें निम्मे श्रेय उत्कृष्ट संवादांवर अवलंबून असतें; किंबहुना एक प्रकारें नाटक म्हणजेच संवाद होत. या दृष्टीनें पाहतां सौभद्र नाटकांतील संवाद फारच बहारीचे आहेत असें म्हणावेंसें वाटतें. त्यांत चमक किंवा चटकदारपणा आहे. बुद्धीचा मनोहर व मार्मिक विलास या संवादांतून पहावयास सापडतो. अन्य संदर्भांत या संवादांपैकीं कांही मागें आलेच आहेत. तरी पण येथेंहि कांही नमुन्या-दाखल दिले आहेत.

दुसऱ्या अंकांत रुक्मिणी व सुभद्रा यांचा संवाद असून त्यांत सुभद्रा रुक्मिणीला उद्देशून बोलते, " बरं तर वहिनी, तुझ्या भावानें तुला शिशुपाल राजाला देऊ केली होती. तो काय रूपानें, पराक्रमानें किंवा ऐश्वर्यानें कमी होता म्हणून तूं चोरून ब्राह्मणाबरोबर पत्र पाठवून कृष्णाला वरलेंस. तें कां बरें ? याचें समर्पक उत्तर दे म्हणजे मी तुमचें सगळें ऐकते. '' यावर रुक्मिणी कांही उत्तर न देता मान खाली घालून बसते. त्यावर सुभद्रा म्हणते, " अहो वहिनीसाहेब, बोला; आणखी उपदेश करा. '' त्यावर

रुक्मिणी म्हणते, " वन्से, तुमचें म्हणणें अगदी बरोबर आहे. परन्तु तुमच्या मनाप्रमाणें माझ्याकडून कांही होण्याजोगें नाहीं; म्हणून मी इतके आढेवेढे घेऊन बोलत होते. " त्यावर सुभद्रा म्हणते, " हें बघ वहिनी, तूं मनावर घेऊन कृष्णाच्या मनांत चांगलें भरवून दिलेंस म्हणजे पुरें आहे. तो मग हव्या त्या रीतीनें माझ्या मनासारखें करील " त्यावर रुक्मिणी म्हणते, " मी ही गोष्ट तिकडे काढली नाहीं असें समजता की काय तुम्ही? याविषयीं बोलले कीं एकेक डोळा एवढाला करायचा. मग मी बाई भिऊन जाते. काय करावें बरं? "

त्यावर सुभद्रा म्हणते, " काय हवें तें कर पण मी जिवंत रहावें असें जर तुझ्या मनांत असेल तर, हरतऱ्हेनें कृष्णाचें मन वळवून त्याच्याकडून वचन घे, आणि तसें तुझ्या मनांतून नसलें तर आतां सांग. उगीच आशा लावून फसवूं नकोस. " त्यावर रुक्मिणी सुभद्रेस पोटाशी धरून म्हणते, " वन्से, तुमचें दुःख पाहून माझें काळीज किनई तिळतिळ तुटतें. पण मी वर दाखविलें नाहीं. आतां तुम्ही अगदी स्वस्थ रहा. माझ्याकडून होईल तितकें मी करीन बरें. "

तिसऱ्या अंकांत कृष्ण-बलरामाच्या संवादांपैकीं अर्धा भाग पुढील-प्रमाणें आहे.

**कृष्ण**--पण ही जेवणाची धांदल कां उडाली, यांतलें इंगित तुम्हाला नाहीं कळलें; तें मी ताडलें आहे.

**बलराम**--अहाहा, बृहस्पतीच तुम्ही! सांगा; सांगा पाहूं काय इंगित तें?

**कृष्ण**- दादा, रागावूं नका. माझ्या पोरबुद्धीला जें वाटलें तें मी सांगतों--

**जेव्हां जेव्हां वाढायातें येई सुभद्रा ती त्या यतिते।**
**भुलुनी पाहुनी तद्रूपातें तैसे नाना ढंग करी॥**
**पंक्तीमध्यें नसतो जरी मी भोळे तुम्हा पाहुनि नामी।**
**भलतें भलतें करितां स्वामी निश्चयपूर्वक मज वाटे॥**

**बलराम**--आग लागोरे तुझ्या या वाणीला ! ज्याला पात्रापात्र विचार नाहीं त्याला मनुष्य म्हणण्यापेक्षां पशू म्हणणें फार चांगलें.

चौथ्या अंकांत सुभद्रेच्या दासी व अर्जुन यांचा पुढीलप्रमाणें संवाद आहे.

**कुसुमावती**--( हात जोडून ) महाराजांना काय पाहिजे आहे ?

**अर्जुन**--( त्रासून ) हं, दूर उभी रहा. अग बटकीचे पोरी, किती तुझा उद्धटपणा हा ! मी इथें सोवळ्यानें बसलों आहें हें तुला दिसत नाहीं ?

( इतक्यांत सारंगनयना दासी प्रवेश करते. )

**सारंगनयना**- ( कुसमावतीस ) यांना इतकें खवळायला झालें तरी काय ?

**कुसुमावती**- ( सारंगनयनेजवळ येऊन ) अग प्रारब्ध माझें ! हे बघ ताईसाहेब जवळ नसल्या म्हणजे हे असेच धडपड करीत असतात.

**सारंगनयना**- खरें बाई ! तूर्त ही आम्हांला साडेसातीच आहे. नाहीशी होईल तो सुदीन.

**कुसुमावती**- अग चांडाळणी, हळूं बोल ! त्यांच्या कानावर का हें गेलें तर ते ताईसाहेबांना सांगायला कांही कमी करणार नाहीत.

**अर्जुन**- ( सुभद्रा काय करीत आहे अशा संकेताचा हात करून ) नारायण ! नारायण ! ( असें म्हणतो. )

**सारंगनयना**—जळलाबाई सगळाच यांचा नारायण ! यांत माणसानें समजावें तरी काय ?

पांचव्या अंकांत अर्जुन-सुभद्रा यांचा संवाद पुढीलप्रमाणें आहे.

**अर्जुन**—सुभद्रे तर तूं आज मला एकान्तसुख देणार ! ठीक आहे, मीहिपण तुझ्याकडून तुझी योग्यच सेवा घेईन.

**सुभद्रा**— किंचित् रागावलेसें करून ) आपण यती आहात तेव्हां कसेंहि भाषण केलें तरी आपणास शोभतें !

**अर्जुन**—प्रापंचिकांशी कसें वागावें याचा आम्हाला अभ्यास नसल्यानें असा कांही बोलण्यांत प्रमाद होतो. तर त्याबद्दल तूं रागावू नकोस.

**सुभद्रा**—अद्वैतनिष्ठजनांची भाषा ऐकण्याचा फारसा प्रसंग मला आला नसल्यानें एखाद्या शब्दाचा अर्थ भलताच भासून असा मनाला रागाचा विकार होतो, तर त्याबद्दल मीच क्षमा मागते. ( असें म्हणून हात जोडते. )

**अर्जुन**—सुभद्रे, तूं फार चतुर आहेस. तुझ्या संगतीत असल्यानें दिवसाचे पळ होऊन वर्षांचा देखील दिवस वाटेल.

**सुभद्रा**—जेणेंकरून पळाचा दिवस आणि दिवसांचें वर्ष मला न वाटेल अशा रीतीनें मला वागवावी म्हणजे झालें.

## सौभद्र नाटकांतील भाषा

सौभद्र नाटकांतील भाषा प्रौढ असून साधी व निरनिराळ्या पात्रांना साजेल अशा प्रकारची आहे. तींत कोठेंहि बोजडपणा किंवा अस्वाभाविकपणा नाही. श्रीकृष्ण, अर्जुन, नारद, बलराम या सर्व मंडळींच्या तोंडी असलेली भाषा अशीच त्यांना शोभेल अशी आहे. त्यांतहि सुभद्रा व रुक्मिणी यांच्या तोंडी असलेली भाषा राजघराण्यांतील स्त्रियांना शोभेल अशी असून, कुसुमावती व सारंगनयना या दासींच्या मुखांतून निघणारी भाषा दासींना स्वाभाविक अशी आहे. खाली दिलेल्या उदाहरणांवरून हा मुद्दा स्पष्ट होईल.

दुसऱ्या अंकांत कुसुमावती व सुभद्रा यांचा संवाद आहे तो असा.—

**कुसुमावती**--अग बाई ! तर मग त्यालाहि तुम्ही त्या वनांत कशा गेलां हें कांहीं ठाऊक नव्हतें. जळ्ळाबाई; साराच मेला चमत्कार ! बरें; पुढें काय झालें ?

**सुभद्रा**--मी अरण्यांत कशी आले असेन व याबद्दल मला दादा व वहिनी बोलतील असें वाटून उरांत जी धडकी भरली त्यासरशी मला मूर्च्छा आली, नि मग जागी झाले तो आपल्या महालांतच आहे !

**कुसुमावती**—बाईसाहेब, हें स्वप्न म्हणावें तर खरोखर आपण नाहीशा होऊन पुन्हा सापडलां. बरें खरें म्हणावें तर ही गोष्ट अमुकच तऱ्हेनें झाली असेल अशी खात्री होत नाहीं तेव्हां याला म्हणावें तरी काय ?

**सुभद्रा**—सखे ! त्या दिवशीच्या धांदलींत आणखी दोन चमत्कार घडून आले आहेत.

**कुसुमावती**--ते कोणते ?

**सुभद्रा**--हे पहा. त्यांची स्वारी जेव्हां द्वारकेंत होती त्यावेळीं एका शेल्यावर मी आपल्या हातांनी कशिदा काढून, त्यावर त्यांचें नांव घालून त्यांना मी मोठ्या ममतेनें दिला होता, तो बाई माझ्या अंगावर होता. व त्याच वेळीं आपल्या गळ्यांतील रत्नमाला काढून माझ्या गळ्यांत आपल्या हातांनी घातली होती ती बाई नाहींशी झाली !

**कुसुमावती**--जें जें ऐकावें तें तें अघटितच ! पण बाई मी तुम्हाला सांगून ठेवते, आपल्या मनासारखें ईश्वर खचित घडवून आणील.

**सुभद्रा**--हें कशावरून म्हणतेस तूं ?

**कुसुमावती**--कशावरून का होईना मी म्हणते यावर आपण अगदी भरंवसा ठेवा.

याच अंकांत पुढें सुभद्रा व रुक्मिणी यांचा संवाद आला आहे तो असा—

**सुभद्रा**--वहिनी, तूं किती जरी साधून घेतलंस तरी मी खरें सांगतें कीं तुझी पहिल्याप्रमाणें माझ्यावर ममता नाहीं.

**रुक्मिणी**--हें कशावरून म्हणता तुम्ही ?

**सुभद्रा**--अग तुझी तशी ममता असती तर तूं माझी इतकी विटंबना चालली असतां डोळ्यांवर कातडें ओढून बसली नसतीस.

**रुक्मिणी**--वन्से, आतां बोललें तर तुम्हाला खंडीभर राग मात्र येईल. मला सांगा काय तुमची विटंबना चालली आहे ? तुम्ही होऊन विनाकारण आपल्या जिवाला संताप करून घेतां.

**सुभद्रा**—मला ज्या गोष्टीचा मनापासून तिटकारा आहे, ती गोष्ट तुम्ही जबरदस्तीनें माझ्याकडून करावयाला लागला तर ती विटंबना नव्हे काय?

**रुक्मिणी**--हं, हं, आतां आलें ध्यानांत, भावोजींनी इतके सायास करून दुर्योधनाला देण्याचें ठरविलें तें काय तुमच्या अकल्याणाकरितां? अहो त्यांच्यासारखा वर आज सगळ्या पृथ्वींत तरी मिळेल काय? केवढी राजसत्ता! किती ऐश्वर्य! इतकें असून, बरें सौन्दर्यांत तरी कमतरता आहे? तीहि नाहीं. फार काय सांगू. उद्यां तुम्ही त्याची पट्टराणी झालांत म्हणजे आम्हांला देखील तुमच्यापुढें मान लववावी लागणार आहे, समजलांत?

**सुभद्रा**—पुरे पुरे, वर्णन. नवराबायकोंनी जसा काय एकच कित्ता गिरविला आहे. वहिनी तो इन्द्रापेक्षांहि भाग्यवान असला तरी मला नको असल्यावर तेथें आग्रहानें मला देऊन माझ्या जन्माची माती कां करितां?

**रुक्मिणी**--छे, छे. अस बोलू नये. असलें भाषण आम्हा बायकांना शोभत नाहीं.

तिसऱ्या अंकांत कृष्ण-रुक्मिणी यांच्या संवादांतील कांहीं भाग पुढील-प्रमाणें आहे.

**कृष्ण**--( रागावल्यासारखें करून ) पुरें, पुरें मी सारें समजलों. तुझ्या मनांतून माझा व दादांचा बिघाड यावा, व स्वतंत्रपणानें आपण निराळेच रहावें. खरोखर प्रपंचांत जें बंधुबंधूचें वाकडें पडते, त्याला कारण स्त्रियाच, यांत संशय नाही. रुक्मिणी तुला जर याच विषयावर आणखी बोलायचें असेल तर मला येथें क्षणभर देखील बसायचें नाही. साफ सांगतो.

**रुक्मिणी**--(रागानें पलंगावरून उतरून, दूर उभी राहून) हें पहा मला लहानपणापासून आपला अनुभव असल्यामुळें हीं सगळीं सोंगें मला कळतात. मी अशा दबकावणीला भ्यायची नाही. हें काय मेले? आज ही चौथी खेप. जेव्हां जेव्हां ही गोष्ट काढावी तेव्हां तेव्हां असेंच काहीं ढोंग करून निघून जायचें. भावाभावांत वाकडें आणणाऱ्या कोण मेल्या अवदसा असतील त्या असोत. त्यांची साक्ष मला देऊं नये; साफ सांगतें.

## सौभद्र— कांहीं खुलासा – उलगडा

अणासाहेब किर्लोस्करांनी इ. स. १८८३ सालीं लिहिलेल्या सौभद्र नाटकाच्या प्रस्तावनेंत असें म्हटलें आहे कीं, "हें नाटक स्वतंत्ररीतीनें तयार न होता अनकूल असलेल्या मंडळींकडे पाहून रचिलें असल्यामुळें सुज्ञ रसिक यांतील दोषांकडे दृष्टि न देतां अल्पगुणांचा बहुमान करतील अशी आशा करतो."

या प्रस्तावनेंत नाटकांतील बऱ्याच घटनांचा उलगडा होतो. उदाहरणार्थ पहिल्या अंकांत अर्जुनाला सुमार्ग दाखविणारा नारद पुढें नाटकांत कोठेंच दिसत नाहीं ! याचें कारण असें कीं बाळकोबा नाटेकर यांजकडे नारदाच्या भूमिकेप्रमाणेंच श्रीकृष्णाची भूमिका असे आणि त्यामुळें, नारदमुनी जे अदृश्य होत ते श्रीकृष्णाचें सोंग घेऊन रंगभूमीवर परत येण्याकरिता. स्वतः अणासाहेबांकडे देखील अशाच तऱ्हेनें सूत्रधार व बलराम अशा दोन भूमिका असल्यानें बलरामाचा प्रवेश पहिल्या अंकांत होऊं शकलेला नाही.

नाटकाच्या एकंदरीत महत्त्वाकडे पाहिलें असतांना नारदमुनींनी शेवटी तरी पार्थाला आशीर्वाद द्यायला यायला हवें होतें. परन्तु शेवटल्या प्रवेशांत श्रीकृष्ण म्हणजे बाळकोबा हे हजर असल्यानें नारदमुनींची उपस्थिति होणार कशी ?

कांही टिकाकारांच्या दृष्टीनें सौभद्रांत आलेले राक्षसांचे प्रवेश न उलगडणाऱ्या कोड्याप्रमाणें होत. मला वाटतें त्या काळच्या नाट्यसृष्टीचा अभ्यास केला असतांना हें कोडें सहज उलगडता येण्याजोगें आहे. किर्लोस्करांच्या काळीं पौराणिक नाटकें लोकांचें मनोरंजन करीत असत. रात्रीं आठ नऊ वाजल्यापासून ते दुसऱ्या दिवशीं पहाटे चार पांच वाजेपर्यंत ही चालून, त्यांतील राक्षस व विदूषक आपल्या अभिनयानें व आरडाओरड्यानें लोकाना खूष करीत असत. राक्षस पार्टी लोकांच्या चांगलेच आवडीचे असत. यामुळें अणासाहेबांनी ज्या वेळीं आपली नाट्यरचना केली, त्या वेळीं त्यांना देखील जुन्या प्रकारच्या किंवा, 'अललडुर्र्' ची नाटकांतील कांही गोष्टी स्वीकाराव्या लागल्या. सौभद्र नाटकांत एक दोन

नाही तर राक्षसांचे तीन प्रवेश याच लोकांच्या आवडीमुळें अण्णासाहेबांना घालावे लागले. खादाड विदूषकाची योजना देखील पौराणिक नाटकांकडे पाहूनच त्यांनी केलली दिसते. इतकेंच नाहीं तर नटी-सूत्रधाराचा प्रवेश हाहि याच पौराणिक नाटकांतून त्यांना घ्यावा लागला. शेक्सपिअरनें आपल्या नाटकांत ज्याप्रमाणे त्याच्या काळच्या प्रेक्षकांच्या मनोरंजनार्थ त्या काळीं आवडणाऱ्या गोष्टींचा अंतर्भाव केला त्याचप्रमाणें अण्णासाहेबांनाहि करावें लागलें. शेक्सपिअरच्या काळीं लोकांचीं रस्त्यावर भांडणें होत. व तीं पहायला बघेहि जमत. असलीं भांडणें रोमिओ-ज्युलिएट, अथेल्लो, व ज्यूलिअस सीझरमध्यें आहेत. प्रेक्षकांना भुतांचे प्रवेश बघायला आवडत म्हणून त्यानें हॅम्लेट, मॅक्बेथ, व ज्यूलिअस सीझरमध्यें भुतांचे प्रवेश योजिले. लोकांची गाण्याची आवड पाहून शेक्सपिअरनें ' ट्वेल्थ–नाइट, हॅम्लेट-मध्यें गाणीं ठेवलीं; लोकांची विदूषकाची आवड लक्षांत घेऊन त्यानें ' ॲज यू लाइक इट ' व ' किंग लिअर 'मध्यें त्यांची योजना केली. अण्णासाहेब किर्लोस्करांनी असाच विचार करून राक्षसांची योजना सौभद्रांत केली असे मला वाटतें.

सरते शेवटीं आभार मानण्याची कामगिरी करावयाची. विदर्भ-मराठवाडा बुक कंपनीने सौभद्राची नाट्यसमीक्षा लिहिण्याची विनंती मला करून व माझ्यामागें एक प्रकारचें टुमणें लावून ती लिहवून घेतली याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१३७२९
REFBK-0013121
REFBK-0013121
ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
६९९३९
१-१-९०
२५/३/९०

## आमचीं कांहीं प्रकाशनें

**गांठ हिमालयाशीं आहे [ कादंबरी ]**
कृ. मु. उजळंबकर — ६=००

**मराठी गद्यगौरव**
प्रा. रु. पां. पाजणकर — २=२५

**मुस्लिम सण आणि संस्कार**
श्रीपाद जोशी — १=८०

**चीनचें आक्रमण व गांधीवाद**
श्रीपाद जोशी — ३=५०

**उर्मिला [ काव्यसंग्रह ]**
प्रा. कृ. ब. निकुंब — ३=००

**Art of Autobiography**
Prof. D. G. Naik — 15=00